संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा


संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने १२ (६+६) | किंमत ३ रूपये | अहमदनगर, गुरूवार दि. १५.०८.२०२४ | अंक नं. १४१ | वर्ष ६७ वे | दैनिक वर्ष ६१ वे | ANR/022/2018-2020












जगप्रसिद्ध नामांकित ब्रँडचे दर्जेदार होम अप्लायसेंस एकाच छता खाली...
• फ्रीज • ए.सी. • वॉशिंग मशिन • एलईडी टीव्ही • होमथिएटर • मोबाईल • होम अप्लायन्सेस
सुलभ हप्त्यावर उपलब्ध 0% फायनान्स
COMPRO Systems & Services
HDB Financial Services BAJAJ FINSERV
अंबर प्लाझा, एचडीएफसी बँके जवळ, स्टेशनरोड, अ.नगर. मो. ९३२५१०३०५०
PHILIPS LG Whirlpool SONY SAMSUNG KENSTAR JVC Electrolux


संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा


संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा



काबरा एक्सप्रेस
डेली A.C बस / अर्जंट पार्सल सर्विस • फुल लोड / पार्ट लोड सर्विस उपलब्ध
गुजरात अहमदाबाद, सुरत, अंकलेश्वर, राजकोट, बडोदा, किम, आनंद,नवसारी, वलसाड, वापी, भरुच, जामनगर
मध्यप्रदेश इंदौर, (राज महोल्ला, तीन इमली) उज्जैन
महाराष्ट्र मुंबई, (वसई, बोरीवली, अंधेरी, भिवंडी, वाशी) औरंगाबाद, नाशिक पुणे
राजस्थान उदयपुर, अजमेर, जयपुर दिल्ली मोरी गेट
साऊथ बंगलोर, हैदराबाद, गोवा
अहमदनगर नेवासकर पेट्रोल पंपासमोर, मार्केटयार्ड चौक, स्टेशन रोड 7972872112



रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने १२ (६+६) | किंमत ३ रुपये | अहमदनगर, बुधवार दि. १४.०८.२०२४ | अंक नं. १४१ | वर्ष ६७ वे | दैनिक वर्ष ६१ वे | ANR/022/2018-2020



असंख्य रक्तदात्यांच्या पाठबळावर तपपूर्ती.. (१२वा वर्धापनदिन)
रक्तविघटन प्रयोगशाळा व अफेरेसिस तंत्रज्ञानासह नगर जिल्ह्यातील अत्याधुनिक अशी
– एकमेव एनएबीएच मान्यताप्राप्त –
अष्टविनायक ब्लड सेंटर
■ शासनमान्य रक्तपेढी ■ २४ तास अविरत सेवा
■ सर्व रक्तघटक उपलब्ध ■ ल्युकोडिप्लिटेड रक्तघटक उपलब्ध
■ २४ तास मोफत कुरिअर सेवा ■ नॅट टेस्टेड रक्त उपलब्ध
■ संपूर्ण सुरक्षित व गुणवत्तापूर्ण रक्त उपलब्ध
■ संपूर्ण रक्त, तसेच विविध रक्तघटक म्हणजेच लालपेशी, प्लाझ्मा, प्लेटलेट्स यांची उपलब्धता
■ अफेरेसिस तंत्रज्ञान (सिंगल डोनर प्लेटलेट्स) उपलब्ध.
NABH ACCREDITED
बारावा वर्धापन दिन १५ ऑगस्ट २०२४
स्वातंत्र्य दिनानिमित्त हार्दिक शुभेच्छा!
रक्तदान हे आरोग्याचं वरदान आहे. निरपेक्ष भावनेने केलेले रक्तदान हे सात्त्विक दान होय. रक्तदान करून आपण रक्तदान चळवळीत व रुग्णसेवेत अनमोल योगदान देत आहात. त्याबद्दल
रक्तदात्यांचे मनःपूर्वक आभार!
असंख्य रुग्णांच्या पाठबळावर तपपूर्ती.. (१२वा वर्धापनदिन)
जागतिक दर्जाच्या उपकरणांसह जिल्ह्यातील एकमेवाद्वितीय अशी कॉर्पोरेट लॅबोरेटरी
स्कायलॅब सुपरस्पेशालिटी
■ जगभरातील अत्याधुनिक उपकरणांनी सुसज्ज
■ प्रशिक्षित व अनुभवी तंत्रज्ञ ■ अहर्निश तत्पर सेवा
■ सर्व रिपोर्ट्स हे एम.डी. पॅथॉलॉजिस्ट तज्ज्ञ डॉक्टरांच्या प्रत्यक्ष निगराणीखाली तयार केले जातात
■ विविध प्रकारचे हार्मोन्स, ट्युमर, मार्कर्स, थायरॉईडच्या तपासण्या
■ टीबीच्या निदानासाठी अत्यंत प्रगत व अत्याधुनिक अशी पीसीआर चाचणी उपलब्ध ■ यंत्रमानवी हातांनी युक्त अशी रोबोटिक टेक्नॉलॉजी.
पहिला मजला, साई पॅलेस, आकाशवाणी केंद्रासमोर, प्रोफेसर कॉलनी चौकाजवळ, अहमदनगर. फोन नं. ०२४१- २४२१३३४/२४२१३३५



गाय हरवली आहे
शिंगेला लाल कलर, काळी पांढरी जर्सी गाय भिंगार येथून गेलेली आहे
आणुन देणाऱ्यास बक्षीस दिले जाईल
संपर्क : महादु नामदे
8390567738



दिल्लीचाट
दु. ३ ते रा.१० वा.
• विविध फ्लेवरमध्ये पाणीपुरी • शेवपुरी, दहिपुरी • बास्केट चॅट, पापडी चॅट • रगडा पॅटीस • रगडा कचोरी • दहिवडा
बम्बईवाला Since 1910 मिठाईयाँ एवम् फरसाण
स्वीट्स । नमकीन । ड्रायफ्रुट । दिल्ली चाट । फास्टफुड
शाखा : चाणक्य चौक, भागिरथी हॉस्पिटल जवळ, बुरुडगाव रोड, अ.नगर.



SONI TILES Since 1965
AND MARBLE INDUSTRIES
Opp. Munot Estate, Station Road, Ahmednagar. Tel. : (0241) 2418720 Mob. 9372497999
Wholesalers & Manufacturers of - Ceramic Wall & Floor Tiles, Vitrified Tiles, Paving Blocks, Marble & Granite
सोनी टाईल्स अँण्ड मार्बल इंडस्ट्रिज



जीवेत शरदः शतम्
आधारस्तंभ
श्री.वसंतराव थोरात

मा.श्री.विजय महादर साहेब (१५ ऑगस्ट)
''तुमच्या इच्छा तुमच्या आकांक्षा उंच उंच भरारी घेऊ दे! मनांत आमच्या एकच इच्छा आपणांस उदंड आयुष्य लाभू दे..''
मा.श्री.विजय महादर साहेब यांना वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा
: शुभेच्छुक :
वसंतराव थोरात, अनंतराव गोले, बाबासाहेब भालेराव, लक्ष्मणराव सांगळे, रमेश गायकवाड, बलराज गायकवाड, मधुकर खताळ, नंदकुमार डापसे, ज्ञानेश्वर धिरडे, सुरेश मिस्तरी.



आकर्षक टॉईजवर २५% सूट
आर.एन.आर्ट अँण्ड क्राफ्ट
गिफ्ट अँण्ड स्कूल स्टेशनरी । होलसेल अँण्ड रिटेलर
एक्सक्लुझिव्ह गिफ्ट, पर्सनालाईझ गिफ्ट अँण्ड टॉईज
काका खवावालासमोर, नेता सुभाष चौक, चितळेरोड, अ.नगर-४१४००१
मो : 9325329061/ 9373417113



चष्मा नको?
आता चष्मा घालवा कायमचा
कॉन्टूरा व्हिजन लेसर नेत्रशस्त्रक्रिया शिबीर
वर्धापन दिनानिमित्त विशेष सवलत
• शिबीर दि.१७ व १८ ऑगस्ट २०२४

Contoura Vision
▶ लेसर नेत्रशस्त्रक्रियेचा जागतिक विक्रम
▶ आंतरराष्ट्रीय कीर्तिच्या नेत्रतज्ज्ञांची टीम
▶ आंतरराष्ट्रीय कीर्तिचे भारतातील ४० वर्षे अनुभवी केंद्र
एकाच छताखाली चष्म्याचा नंबर घालविण्यासाठी १६ प्रकारचे तंत्रज्ञान -०.५ ते -४० पर्यंत आणि +१८ पर्यंत कोणताही नंबर घालवा
डॉ. कांकरियांचे
ASIAN EYE HOSPITAL AND LASER INSTITUTE
Man Kanhaiya Eye Bank Donate Vision
साई सूर्य नेत्रसेवा दृष्टी साजरी करा
www.asianeyehospital.com www.saisuryasupervision.com
वर्धमान, माणिकचौक, अहमदनगर
www.saisuryasupervision.com
Email : saisuryaa85@yhoo.com
9112288611
8888982222



कोहिनूर® सदा सर्वदा सर्वांसाठी सर्वोत्तम कपडे
4 दिवस आनंदाचे
15 AUG 16 AUG 17 AUG 18 AUG
प्रत्येक वस्त्रखरेदीवर 25%* हमखास डिस्काऊंट

एम.जी. रोड | कोहिनूर मॉल, सावेडी अहिल्यानगर 7447 7447 90
SCAN TO FOLLOW US
T & C Apply

जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक

संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

फोन-२४१४१४१, २४१७७७७

भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. - कै.आचार्य गुंदेचा

email - navamaratha@gmail.com



EARTH's
Green Library
Greenery for Every Space

Get a Plant Today!

- Potted Planters
- Premium Planters
- Garden Accessories
- Garden Furniture
- Garden Lightings

Fresh Environment with Indoor Plants

Amit Sanklecha 99231 43334
Website : greenlibrary.in

Opp. Ramadevi Temple, Next to Kamada Machine Tools, Zopadi Canteen, Savedi, AHMEDNAGAR - 414 003

## हे माझे शहर... आमचे राष्ट्र ही भावना महत्त्वाची

### जबाबदारी टाळणे हे पारतंत्र्य. कर्तव्यता हेच खरे स्वातंत्र्य.

नेमेचि येतो पावसाळा या उक्तीप्रमाणे १५ ऑगस्ट - स्वातंत्र्यदिन पुन्हा आला आहे. नेहमीप्रमाणे घर, गल्ली, दुकान, कार्यालयावर झेंडा उभारला जाईल. देशभक्तीपर गाणी चौकाचौकात (मोठ्या आवाजात) ऐकवली जातील. दुसऱ्या दिवसापासून रोजच बेजबाबदार बोलणं, वागणं, स्वार्थ, भ्रष्टाचार, गलिच्छ राजकारण, सार्वजनिक अस्वच्छता, चांगल्या गोष्टी व्हायला पाहिजेत पण त्या दुसऱ्यांनी कराव्यात ही प्रवृत्ती इ.इ. चालूच राहील.

तरी बरं, मागील काही वर्षापासून राष्ट्रीयत्वाबद्दल काहीशी जनमानसता तयार होत आहे. तरीपण स्वातंत्र्यदिनी केवळ स्टेटसवर शुभकामना देण्याबरोबर आपण स्वातंत्र्याची महत्त्वतता, राष्ट्रभावना, समाजाबाबत कर्तव्य व जबाबदारी याविषयी प्रामाणिकपणे चिंतन करणार आहोत का?






जशी प्रजा तसा राजा असंच घडतंय का? स्वातंत्र्याच्या शुभदिनानिमित्त आपल्या देशाच्या स्वातंत्र्याचा इतिहास, शूरवीरांच्या कथा नवीन पिढीला सांगतांनाच वैयक्तिक, कौटुंबिक, सामाजिक व राष्ट्रीय कर्तव्य परायणता याचा प्रचार-प्रसार करणं आवश्यक आहे.

पूर्वी आकाशवाणीवर एक घोषवाक्य यायचे, ''देशानं तुम्हांला काय दिलं यापेक्षा तुम्ही देशाला काय देता हे महत्त्वाचे.''

चला शुभचिंतन, मनन करवूया. स्वातंत्र्याच्या शुभकामना.

# शहरातील 'लोंबकळणाऱ्या वायरी' व 'उघड्या डिपी'कडे 'महावितरण'च्या दुर्लक्षामुळे नागरिकांचा जीव धोक्यात

### उपाययोजना करण्याबाबत अधिकाऱ्यांना निवेदन

नगर - विद्युत महावितरणच्या दुर्लक्षामुळे धोकादायक परिस्थिती निर्माण झालेली आहे. या भागात विद्युत पुरवठा करणारी लोंबकळणारी मुख्य लाईनची (हायटेन्शन) वायर ओढून घेऊन त्याला उंची द्यावी व उघड्या असलेल्या डिपीला बंदिस्त करण्याच्या मागणीसाठी शिष्टमंडळाने विद्युत महावितरणचे अतिरिक्त कार्यकारी अभियंता सुजाता एस. नगराळे यांची भेट घेऊन निवेदन दिले.

मुकुंदनगरच्या प्रश्नाबाबत शिष्टमंडळाने त्यांचे लक्ष वेधून तातडीने उपाययोजना करण्याचा आग्रह धरला. यावेळी अतिरिक्त कार्यकारी अभियंता नगराळे यांनी कर्मचाऱ्यांशी तातडीने संपर्क साधून लोंबकळणाऱ्या वायरीची उंची वाढविण्यासंदर्भात व कमी उंचीचे पोल बदलण्या संदर्भात सूचना केल्या. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस अल्पसंख्यांक विभागाचे शहर जिल्हाध्यक्ष साहेबान जहागीरदार, खालिद शेख, समीर खान, मोहसीन शेख, नवेद शेख, टिपू भाई, शहेबाज बॉक्सर, शाहनवाज शेख, सोनू शेख, जावेद राजे, तंजीम शेख, भैय्या पठाण, अकदस शेख, शहेबाज मिर्झा, अरबाज शेख, फिरोज पठाण आदींसह भागातील नागरिक उपस्थित होते.

विद्युत पुरवठा करणारी लोंबकळणारी मुख्य लाईनची (हायटेन्शन) वायर व उघड्या असलेल्या डिपीमुळे मुकुंदनगर भागातील नागरिकांचा जीव धोक्यात आला आहे. महावितरणचे या प्रकाराकडे दुर्लक्ष होत असल्याने भविष्यात मोठी दुर्घटना घडण्याची शक्यता नाकारता येत नाही.

मुख्य लाईनची (हायटेन्शन) वायर मुकुंदनगर भागातील फकीर वाडा रहेमानिया कॉलनी, दम बारा हजारी दर्गा परिसर, समीर नगर, गौरव नगर, वाबळे कॉलनी, तमिमदारी मस्जिद परिसर, पठाण कॉलनी, एकता कॉलनी, गोविंदपुरा, आयेशा मस्जिद परिसर, नवेद कॉम्प्लेक्स, इनाम मस्जिद, नवीन मुकुंदनगर, बडी मरियम मस्जिद परिसर, गरीब नवाझ मस्जिद परिसर, हुसेनिया मस्जिद दगडी चाल, राजकोट चाल, संजोगनगर, सीआयव्ही सोसायटी, छोटी मरियम मस्जिद परिसर, दरबार कॉलनी, मुल्ला कॉलनी, बडी मस्जिद, जुना मुकुंदनगर परिसर, शिरीन बाग, बॉम्बे हॉस्पिटल परिसर, नशेमान कॉलनी परिसरातून गेलेली आहे.





शहरात लोंबकळणाऱ्या वायरी व उघड्या डिपीबाबत उपाययोजना कराव्यात, या मागणीचे निवेदन महावितरणच्या अधिकाऱ्यांना देण्यात आले.

ही वायर सध्याच्या परिस्थितीमध्ये अत्यंत खाली आली असून, ती अनेक ठिकाणी सहज नागरिकांच्या हाताला लागेल इतकी खाली लोंबकळत आहे. यामुळे या परिसरातील नागरिकांचा जीव धोक्यात आला आहे.

२०१८ मध्ये इनाम मस्जिद परिसरात बांधकाम सुरु असताना विश्वनाथ उर्फ नितीन भालेराव या कामगाराचा वायरीला हात लागून जीव गेला. तर काही महिन्यांपूर्वी फकीरवाडा भागात विद्युत वायरीला धक्का लागून एका बालकाचा देखील जीव गेला आहे. सध्याच्या परिस्थितीमध्ये ही वायर अजून खाली येऊन धोकादायक बनली आहे. तसेच या भागातील अनेक डिपी उघड्या असून, लहान मुले खेळत असतात व महिला व नागरिक या रस्त्यावरून नेहमी ये-जा करीत असतात. यापासून त्यांना धोका निर्माण झाला आहे. सध्या पावसाळ्याचे दिवस असल्याने कधीही पाऊस व वारा येवून लोंबकळलेली ही मुख्य विद्युत वाहक वायर जमीनीवर पडून मोठी दुर्घटना घडू शकते. याकडे मात्र संबधित विभागाचे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप करण्यात आला.

महावितरणने या गंभीर प्रकाराकडे दुर्लक्ष न करता तातडीने धोकादायक बनलेल्या लोंबकळणारी मुख्य लाईनच्या (हायटेन्शन) वायर ओढून घेऊन त्याला उंची द्यावी व उघड्या असलेल्या डिपीला बंदिस्त करण्याची मागणी राष्ट्रवादी काँग्रेस अल्पसंख्यांक विभागाच्या वतीने करण्यात आली आहे. या मागणीकडे दुर्लक्ष झाल्यास मुकुंदनगर येथील नागरिकांसह कोणतीही पूर्वसूचना न देता, विद्युत महावितरण कार्यालयात तीव्र आंदोलन करण्याचा इशारा देण्यात आला आहे..

विद्युत महावितरण ज्याप्रमाणे सक्तीने वीज वसुली करते, त्याप्रमाणे नागरिकांना देखील सेवा पुरविणे महावितरणचे कर्तव्य आहे. फक्त पैश्यासाठी विद्युत महावितरणने सेवा न देता, नागरिकांच्या सुरक्षिततेकडे देखील लक्ष द्यावे. मुकुंदनगर भागात काही दुर्घटना घडल्यास त्याला विद्युत महावितरण जबाबदार राहणार आहे, असे साहेबान जहागीरदार यांनी म्हटले आहे.

## मालवाहू टेम्पोची धडक; दुचाकीस्वार जागीच ठार

नगर - चुकीच्या दिशेने भरधाव वेगात आलेल्या टाटा कंपनीच्या छोटा हत्ती या मालवाहू टेम्पोने मोटारसायकलला जोरदार धडक दिल्याने झालेल्या अपघातात मोटारसायकलवरील तरुणाचा जागीच मृत्यू झाला. नगर - कल्याण महामार्गावर कर्जुले हर्या गावच्या शिवारात मंगळवारी (दि.१३) सायंकाळी ६.३० च्या सुमारास ही घटना घडली. शंकर म्हातारबा वाघ (वय ३०, रा. कर्जुले हर्या, ता. पारनेर) असे मयत तरुणाचे नाव आहे.

मयत शंकर वाघ हा त्यांचे मोटार सायकलवर (क्र. एम.एच.१६ डी. एच. ४१८३) कर्जुले हर्या वरुन टाकळी ढोकेश्वर बाजुकडे जात असताना नगरहून भरधाव वेगात येणाऱ्या टाटा कंपनीचा छोटा हत्ती (क्र. एम.एच.१६ सी.डी. ७३४९) या वरील अज्ञात चालकाने त्याचे ताब्यातील वाहन भरधाव वेगात रॉंग साईडला घेवुन येवून शंकर याचे मोटारसायकलला जोराची धडक दिली. त्यामुळे शंकर हा रस्त्यावर पडून गंभीर जखमी झाला. तसेच उपचारापूर्वीच त्याचा मृत्यू झाला. अपघातानंतर टेम्पो चालक पसार झाला. याबाबत मयताचा भाऊ सागर म्हातारबा वाघ याने टाकळी ढोकेश्वर पोलीस दुरक्षेत्र येथे दिलेल्या फिर्यादी वरून पारनेर पोलिस ठाण्यात टेम्पोचालकाविरुद्ध अपघाताचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## बेवारस स्थितीत आढळून आलेल्या बालकाच्या माता-पिता व नातेवाईकांनी संपर्क साधावा

नगर - शिरसगाव (ता. श्रीगोंदा) येथे अंदाजे ६ वर्षे असलेला निखिल नावाचा बालक लता वसंतराव सुर्यवंशी यांच्या राहत्या घरासमोर बेवारस अवस्थेमध्ये आढळला आहे. या बालकास शिशुगृह, अहमदनगर येथे बालकल्याण समिती, नगर यांच्या आदेशान्वये पोलीस स्टेशन, श्रीगोंदा यांच्यामार्फत दाखल करण्यात आले आहे.

चि. निखिल या बालकावर हक्क दाखविणारे माता-पिता व इतर नातेवाईकांनी जिल्हा बाल संरक्षण अधिकारी वैभव देशमुख भ्रमणध्वनी क्र. ९९२१११२९११, ०२४१-२४३११७१ अथवा शितल प्रभुने शिशुगृह दत्तक विधान केंद्र यांच्याशी ८३९०७९९८००, ०२४१-२९९२१४४ या क्रमांकावर अथवा प्रत्यक्ष ३० दिवसाच्या आत संपर्क साधण्याचे आवाहन जिल्हा बाल संरक्षण अधिकारी, अहमदनगर यांनी केले आहे.

## दीपक गांधी यांचे हृदयविकाराने निधन



नगर - आनंदी बाजार येथील रहिवाशी दीपक पन्नालाल गांधी (वय ५२) यांचे १३ ऑगस्ट रोजी दुपारी हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने निधन झाले. त्यांच्यावर १४ ऑगस्ट रोजी नालेगाव, अमरधाममध्ये अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुली, लहान भाऊ, भावजयी, दोन विवाहित बहिणी, जावई, नातवंडे असा परिवार आहे. आनंदी बाजार येथील 'सनमून' स्टोअर्सचे ते संचालक होत.

## सुनंदाबाई वाघमारे यांचे अल्प आजाराने निधन



नगर - काटवन खंडोबा रोड येथील रहिवासी सुनंदाबाई नामदेवराव वाघमारे (वय ६५) यांचे १३ ऑगस्ट रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्यावर नालेगाव, अमरधाममध्ये अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्यामागे पती, एक मुलगा, तीन मुली, सुना, जावई, नातवंडे असा परिवार आहे.

## चंद्रभागाबाई सप्रे यांचे अल्प आजाराने निधन



नगर - नागापूर येथील रहिवासी चंद्रभागाबाई नामदेवराव सप्रे (वय ८०) यांचे १३ ऑगस्ट रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्यावर नागापूर येथील अमरधाम-मध्ये अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या पश्चात माजी नगरसेवक दत्ता पाटील सप्रे, बाळासाहेब सप्रे व शिवाजी सप्रे ही ३ मुले, १ मुलगी, सुना, जावई, नातवंडे असा परिवार आहे. माजी नगरसेविका कमलताई सप्रे यांच्या त्या सासू होत.

## विष्णु लबडे यांचे अल्पशः आजाराने निधन



श्रीरामपूर - येथील महादेव मंदिर देवस्थानचे विश्वस्त, रेल्वे स्टेशन हनुमान मंदिरचे सेवेकरी व लबडे टेन्ट हाऊसचे मालक विष्णु मारुती लबडे (वय ६२) यांचे १३ ऑगस्ट रोजी पहाटे ४:३० वा.अल्पशः आजाराने निधन झाले.

## बाबासाहेब बोंबले यांचे अल्पश: आजाराने निधन



श्रीरामपूर - येथील शेतकरी बाबासाहेब लक्ष्मण बोंबले (वय ५८) यांचे १३ ऑगस्ट रोजी रात्री ९:३० वाजता अल्पश: आजाराने दुःखद निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन भाऊ, एक मुलगा, एक मुलगी, पुतणे, जावई, नातवंडे असा परिवार आहे.

दत्तात्रय बोंबले व अनिल बोंबले यांचे बंधू, शरद बोंबले यांचे वडील, हॉटेल दुर्वांकुरचे मालक देविदास दत्तात्रय बोंबले, आराध्या ॲक्काचे अमोल अनिल बोंबले व राहुल अनिल बोंबले यांचे चुलते होत.

## मराठा आरक्षण शांतता रॅलीत दोघांचे खिसे चोरट्यांनी कापले

### ६५ हजार गेले चोरीला; केडगाव ते रेल्वेपुल दरम्यान घडली घटना

नगर - मराठा समाजाला आरक्षण मिळण्यासाठी लढा देणारे मनोज जरांगे पाटील यांच्या सोमवारी (दि.१२) नगरमध्ये आयोजित केलेल्या मराठा आरक्षण शांतता रॅलीत केडगाव वेस ते रेल्वे उड्डाणपूल या दरम्यान दोघांचे खिसे चोरट्यांनी कापून ६५ हजारांची रोकड पळविल्याची घटना समोर आली आहे. या प्रकरणी मंगळवारी (दि.१३) कोतवाली पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे.

याबाबत प्रतिक श्रीधर कोतकर (वय २८, रा. शिवाजीनगर, केडगाव) यांनी फिर्याद दिली आहे. मनोज जरांगे पाटील यांचे केडगाव येथे अर्चना हॉटेल समोर सोमवारी (दि.१२) दुपारी जोरदार स्वागत करण्यात आले, त्यानंतर तेथून मराठा आरक्षण जनजागृती शांतता रॅली नगरच्या दिशेने मार्गस्थ झाली. या रॅलीत फिर्यादी कोतकर व त्यांचे मित्र शरद अनवने हे दोघे सहभागी झाले होते. केडगाव ते रेल्वे उड्डाणपूल या दरम्यान रॅलीत चालत असताना तेथे असलेल्या गर्दीत अज्ञात चोरट्यांनी कोतकर यांच्या खिशातून १० हजार आणि त्यांचे मित्र शरद अनवने यांच्या खिशातून ५५ हजार अशी ६५ हजारांची रोकड चोरली. ही बाब निदर्शनास आल्यावर तसेच रॅली व जनसंवाद सभा संपल्यावर त्यांनी मंगळवारी (दि.१३) कोतवाली पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. या फिर्यादी वरून पोलिसांनी अज्ञात चोरट्यांच्या विरुद्ध बी.एन.एस. २०२३ चे कलम ३०३, (२) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दरम्यान मराठा आरक्षण जनजागृती शांतता रॅलीत व जनसंवाद सभेत घुसलेल्या १४ चोरट्यांच्या टोळीला कोतवाली पोलिसांच्या पथकाने पकडले होते.

त्यांच्याकडून ६ लाख ५० हजारांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला होता. या टोळीतील काहींना या गुन्ह्यात हस्तांतरित करण्यात येणार असल्याचे पोलिसांनी सांगितले.

## माझी लाडकी बहीण योजना समितीच्या सदस्यांनी घेतली मनपा उपायुक्तांची भेट

### अर्ज भरणाऱ्या महिलांच्या अडी-अडचणी सोडविण्यासाठी केली चर्चा; मनपाची यंत्रणा अजून प्रभावी करण्याची मागणी



माझी लाडकी बहीण योजना समितीच्या सदस्यांनी उपायुक्तांची भेट घेवून अर्ज भरणाऱ्या महिलांच्या अडी-अडचणी सोडविण्यासंदर्भात चर्चा केली.

नगर - मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचे अर्ज भरताना शहरातील महिला भगिनींना येणाऱ्या अडी-अडचणी सुटण्यासाठी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना विधानसभा क्षेत्र निहाय समितीचे अध्यक्ष आमदार संग्राम जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली समितीचे सदस्य प्रा. माणिक विधाते व प्रकाश भागानगरे यांनी मनपा उपायुक्त डॉ. विजयकुमार मुंडे व तडवी यांची भेट घेऊन चर्चा केली. या योजनेचा लाभ महिलांना मिळण्यासाठी त्यांना येणाऱ्या समस्या सोडविण्याकरिता मनपा प्रशासनाची यंत्रणा अजून प्रभावी करण्याची मागणी समितीच्या सदस्यांनी केली.

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचे अर्ज महापालिका प्रशासनाकडून भरुन घेतले जात आहे. झोन ऑफिस व मनपा कार्यालयात स्वतंत्र्य कक्ष बनवून माझी लाडकी बहीण योजनेचे अर्ज भरणे सुरु आहे. मात्र ओटीपी न येणे, अर्ज पेन्डिंग असणे, वेबसाईटचे सर्व्हर डाऊन असणे, आवश्यक कागदपत्रांमधील त्रुटी आदी समस्यांचा त्रास महिलांना सहन करावा लागत आहे. हा त्रास कमी होण्यासंदर्भात प्रा. माणिक विधाते व प्रकाश भागानगरे यांनी उपायुक्त मुंडे यांच्याशी चर्चा केली.

सध्या अर्ज भरताना लाभार्थींना ओटीपी येणार नसून, अर्ज भरल्याचा मेसेज प्राप्त होणार असल्याची माहिती उपायुक्त मुंडे यांनी दिली. तर तातडीने संबंधित विभागाला महिलांच्या अडी-अडचणी सोडविण्याच्या सूचना त्यांनी केल्या.

## बचत गटाच्या नावाखाली महिलांची फसवणूक व शोषणाची चौकशी करा अन्यथा उपोषण करणार



बचत गटाच्या नावाखाली महिलांची फसवणूक व शोषणाची चौकशी करावी या मागणीचे निवेदन निवासी उपजिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आले.

नगर - बचत गटाच्या नावाखाली बोल्हेगाव येथील बँकचे मॅनेजर, अधिकारी, कर्मचारी नागरिकांच्या बनावट कागदपत्राद्वारे कर्जाच्या रकमा देऊन महिलांचे शोषण करत असल्याचा आरोप रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (गवई) च्या वतीने करण्यात आला आहे. तर संबंधित बँकेच्या अधिकाऱ्यांची चौकशी करुन त्यांच्यावर कारवाई करण्याच्या मागणीचे निवेदन निवासी उपजिल्हाधिकारी राजेंद्रकुमार पाटील यांना देण्यात आले. यावेळी शहर कार्याध्यक्ष दानिश शेख, ओबीसी शहराध्यक्ष विजय शिरसाठ, वाहतुक जिल्हाध्यक्ष संदीप वाघचौरे, मुन्ना भाऊ आदी उपस्थित होते.

बोल्हेगाव येथील बँक बचत गटाच्या नावाखाली महिलांना कर्ज मिळवून देतात. पहिले २५ ते ३० हजाराचे कर्ज फेडल्यास पुन्हा ५० हजाराचे वाढीव कर्ज दिले जाते. कर्ज देताना महिलांकडून बँक आधार कार्ड, पॅन कार्ड, लाईट बिल व इतर कागदपत्रे घेतात. परंतु ज्यांच्याकडे कागदपत्रे अपूर्ण असेल, तर बँक कर्मचारी यामध्ये जुगाड करून त्यांना ते कागदपत्र उपलब्ध करून देतात. कोणत्याही महिलेकडे एखादे कागदपत्र कमी असल्यास जास्तीचे पैसे घेऊन सर्व कागदपत्रे बनावट सादर करुन जमा केली जात असल्याचा आरोप करण्यात आला आहे.

एखाद्या महिलेला बचत गटाचा हप्ता भरण्यास उशीर झाला, तर कर्ज वसुलीच्या नावाखाली बँकेचे लोक त्या महिलेच्या घरी दिवस-रात्र येऊन बसतात. कर्ज वसुलीच्या नावाखाली महिलांशी गैरप्रकार केल्याच्या अनेक घटना घडल्या असून, याप्रकरणी अनेक गुन्हे देखील दाखल आहेत. बचत गटाच्या माध्यमातून महिलांना कर्ज देऊन त्यांचे एकप्रकारे शोषण सुरु आहे. माझे व माझ्या पत्नीचे आधारकार्डवर दुसऱ्यांचे सह्या घेऊन बँकेतला शिक्का मारून वापरले गेले आहे. ते कागदपत्र गोपनीय स्वरूपात प्राप्त झाले असून, त्यावर खोटे सह्या, बँकेचा शिक्का व माणसाचा फोटो असल्याचे शेख यांनी निवेदनात म्हंटले आहे.

कागदपत्रात अफरातफर करुन बचत गटाचे कर्ज प्रकरणे मंजूर करणाऱ्या दोषी अधिकाऱ्यांवर गुन्हे दाखल करावे, या भ्रष्टाचाराचा उघड होण्यासाठी संबंधित बँकेची चौकशी व्हावी, महिलांचे शोषण थांबविण्यासाठी ज्यांची फसवणुक झाली त्यांचे कर्ज माफ करावे व भरलेले पैसे त्यांना परत मिळण्याची मागणी रिपाईच्या वतीने करण्यात आली आहे. अन्यथा रिपाईच्या वतीने उपोषण करण्याचा इशारा देण्यात आला आहे.

## गणपती बसवा अन् पुरस्कार मिळवा

नगर - गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर सरकारकडून सर्वोत्कृष्ट मंडळाला पुरस्कार दिला जाणार आहे. सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाने स्पर्धेत सहभागी होण्यासाठी ३१ ऑगस्टपर्यंत पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी, मुंबई यांच्या ई-मेल आयडीवर अर्ज पाठवणे आवश्यक आहे. या स्पर्धेत धर्मादाय आयुक्त यांच्याकडे नोंदणी केलेल्या किंवा स्थानिक पोलिसांकडे किंवा स्थानिक स्वराज्य संस्था यांची परवानगी घेतलेल्या सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांना सहभागी होता येईल. स्पर्धेत गणेश मंडळांनी सहभागी व्हावे, असे आवाहन जिल्हा प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.

**निकष काय?** सांस्कृतिक कार्यक्रम, संस्कृतीचे जतन, गडकिल्ले जतन व संवर्धन, सामाजिक उपक्रम, पर्यावरणपूरक मूर्ती, पर्यावरणपूरक सजावट, ध्वनिप्रदूषणरहित वातावरण, पारंपरिक देशी खेळांच्या स्पर्धा तसेच गणेशभक्तांसाठी देत असलेल्या सुविधांची पाहणी करून गुण दिले जाणार आहेत. या स्पर्धेत सहभागी गणेशोत्सव मंडळांनी केलेल्या कार्याबाबतचा कालावधी सन २०२३ च्या अनंत चतुर्दशी ते सन २०२४ च्या गणेश चतुर्दशीपर्यंतचा असेल.

**प्रथम पुरस्कार पाच लाखांचा** राज्यातील पहिल्या तीन क्रमांक विजेत्या सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांना अनुक्रमे पाच लाख, अडीच लाख आणि एक लाख रुपयांचे पारितोषिक व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात येणार आहे.

**जिल्हास्तरावर २५ हजार रुपये** जिल्ह्यातून प्रत्येकी एक सर्वोत्कृष्ट गणेशोत्सव मंडळाची शिफारस केली जाईल. मंडळाचे नाव, कागदपत्रे व व्हिडीओसह राज्यस्तरीय निवड समितीकडे जिल्हाधिकाऱ्यांमार्फत पाठविले जाईल. जिल्ह्यातील विजेत्या मंडळास २५ हजार रुपयांचे पारितोषिक व प्रमाणपत्र दिले जाईल.

**३१ ऑगस्टपर्यंत अर्ज करा** गणेशोत्सव स्पर्धेत सहभागी होण्यासाठी मंडळांना ३१ ऑगस्टपर्यंत mahotsav.pldagmail.com या ई-मेल आयडीवर अर्ज करावा लागेल. मुदतीत अर्ज आलेल्या मंडळाची पाहणी केली जाणार आहे. स्पर्धेच्या अधिक माहितीसाठी जिल्हाधिकारी कार्यालय किंवा संबंधित तहसील कार्यालय यांच्याशी संपर्क करावा.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहमदनगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

# गृहिणी

## आरोग्य

### जेवणासंबंधी काही नियम

जेवताना हळूहळू आणि प्रत्येक घास चावून खावा. दुपारी जेवून लगेच आडवे होण्याने हमखास ॲसिडीटी वाढते. त्यामुळे दुपारची वामकुक्षी टाळावी.

## पाककला

### कॉर्न फ्लॉवर वड्या

**साहित्य** – ३ वाट्या ओले खोबरे, १ कप दूध, १ वाटी कॉर्नफ्लॉवर, तिन्ही मिळून जेवढे होईल तेवढी साखर, ४–५ वेलदोड्यांची पूड, केशरी रंग, काजू व अक्रोडचे काप.

**कृती** – ओले खोबरे एका बाऊलमध्ये घ्यावे. त्यावर गरम दूध ओतून तासभर बाजूला ठेवावे. नंतर नारळाचे दूध काढून घ्यावे. दूधात कॉर्नफ्लोअर, साखर, थोडा लाल रंग व वेलदोड्यांची पूड घालून मिश्रण सारखे करावे. त्यात दूधात भिजवलेला नारळ खव घालावा. गॅसवर ठेवून ढवळावे. सतत हलवत राहावे. घट्टसर झाले की, उतरवावे व तूप लावलेल्या थाळीत ओतावे.

वरून काजू व अक्रोडचे काप पसरवून हलक्या हाताने थापून ठेवावे. गार झाल्यावर वड्या पाडाव्यात.

## सल्ला

### असा करा भात

भात करतेवेळी त्यात लिंबाचा रस टाकल्यास भात पांढराशुभ्र होतो आणि एक चमचा तेल वा तूप टाकल्यास भाताचे दाणे सुटे फडफडीत होतात. वाढण्यापूर्वी भाताच्या पातेल्याचे तोंड कापडाने झाका. यामुळे कापड सर्व वाफ शोषून घेईल व भाताचे खडे तयार होणार नाहीत.

## वास्तू

देवघराची खिडकी व दरवाजे पश्चिम बाजूला नसून उत्तर वा पूर्व दिशेला असावेत.

## सौंदर्य

जखमेचे व्रण रक्तचंदन रोज पाण्यात उगाळून लावल्यास २ दिवसात कमी होऊ लागतात.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा, नगर.**

# दैनिक पंचांग

गुरुवार, दि. १५ ऑगस्ट २०२४

**स्वातंत्र्य दिन, पारशी नववर्षारंभ, शके १९४६ क्रोधीनामसंवत्सर, श्रावण शुक्लपक्ष, ज्येष्ठा १२।५३, सूर्योदय ०६ वा. २८ मि. सूर्यास्त ०६ वा. २९ मि.**

## राशिभविष्य

**मेष** : व्यापारात आपल्या सेवेच्या मोबदल्यात योग्य लाभ मिळेल.

**वृषभ** : आपला एखादा मित्र आपल्या विचारांबद्दल महत्वपूर्ण सल्ला देऊ शकतो.

**मिथुन** : काही गोष्टी आपल्या जीवनात आकस्मिकरीत्या आनंद आणतील.

**कर्क** : आपल्या नवीन आवडींना प्रोत्साहन द्याल.

**सिंह** : आज रात्री चांगली विश्रांती घ्याल. रहाते घर बदलण्यासाठी दिवस उत्तम.

**कन्या** : काही लोक आपल्यावर दबाव आणतील. परंतु संयमाने आपण प्रकरण हाताळाल.

**तूळ** : आर्थिक बाबतीत काळ अनुकूल आहे.

**वृश्चिक** : सामाजिक कार्यांमध्ये सहयोग अनुकूल राहील व मान–सन्मान वाढेल.

**धनु** : निष्कारण प्रश्नांचा त्रास राहील. आरोग्याची काळजी घ्या.

**मकर** : आजचा दिवस आपल्या कार्य–योजनेंसाठी विधायक ठरेल.

**कुंभ** : अधिक चांगली कामाची स्थिती आणि सामर्थ्य सिद्ध कराल.

**मीन** : आपले इप्सित साध्य होण्याचे योग येतील. वाहने व वस्तूंची चोरी होण्याची शक्यता आहे.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा, नगर.**

## हसा आणि शतायुषी व्हा!

पत्नीला त्रासून पती घराबाहेर पडताच...

पत्नी : कुठे जात आहात?

पती : मरायला चाललोय...सुसाईड करीन...

पत्नी : कुठेही जा, पण स्वेटर घालून जा, बाहेर खूप थंडी आहे, आजारी पडल्यावर तुमची खैर नाही.

## रविंद्रनाथ टागोरांच्या कविता

(मूळ इंग्रजीत)




हात हाताशी जोडले जातात  
व डोळे डोळ्यांशी भिडतात  
ह्या पासूनच आपल्या हृदयाचे  
धडधडणे चालू होते

**मूळ इंग्रजी कविता – रविंद्रनाथ टागोर**  
**मराठी अनुवाद – अरविंद ब्राम्हणे,**  
भिंगार मो. ९४०३७३४२८१

## शब्दगंध क्र. ६९८९

सौ.शैलजा कुलकर्णी



**आडवे शब्द :–** १) तळलेला एक गोड पदार्थ ३) लाज नसलेला; एक वनस्पती ६) बैलाच्या मानेवरचा उंचवटा ८) पिण्याचे पाणी थंड करण्याचे मातीचे एक भांडे ९) घोंगडी तयार करणारा एक समाज; मेंढपाळ १०) माळ; बरोबरी; हार; तुलना ११) एक पक्वान्न; खीर १२) एक फळ १४) पचणारे १५) अवघड; सोपे नसलेले १७) तरळ; क्षणिक; पातळ १९) वेगाने वाहणारी हवा; पवन २०) हर; प्रत्येक; किंमत; भाव २१) निस्तेज; पांढरे चक्क

**उभे शब्द :–** १) श्रम; परिश्रम; मेहनत २) जीवित; आयुष्य; उमर; पाणी ३) न भिणारा; न घाबरणारा ४) लक्ष्मीचा पती; विष्णू ५) एक प्रकारचे धान्य ७) घोडीचे किंवा गाढवीचे वासरू ९) पाणी अडविण्यासाठी नदी वगैरेत बांधलेली आडवी भिंत १०) एक फळ ११) एक सम संख्या; पांडवांची संख्या १३) समस्त; सर्व; सारे १४) बेचव; पाणी जास्त असलेले (कालवण); सपक १६) ताटापेक्षा थोडे मोठे असलेले एक पात्र १८) हाळ; खंदक; हलणारे १९) जेवताना पातळ कालवण ज्यात वाढून घेतात ते छोटे पात्र

### शब्दगंध क्र. ६९८८ चे उत्तर



# मुलांचे विश्व

: संकलक :
ॲड.सौ. पूजा गुंदेचा

**सुविचार** : ज्या ठिकाणी भीती आहे तेथे धर्म नाही. – **महात्मा गांधी.**

## मुलांसाठी मेडिकल जनरल नॉलेज

### अंतराळयानाचा किमान वेग किती असावा लागतो?

समजा तुम्ही एक चेंडू वेगानं वर आकाशात फेकला, तर त्या चेंडूचं काय होत? तो तसाच वर वर आकाशात जात राहतो का? नाही. तो एका विशिष्ट अंतरापर्यंत जातो, तिथंच थांबल्यासारखा होतो आणि मग परत जमिनीकडे झेपावत राहतो. म्हणून तर फलंदाजानं आकाशात टोलवलेला चेंडू परत खाली येतो आणि त्याचा झेल घेता येतो. तुम्ही तोच चेंडू अधिक जोरानं फेकलात किंवा टोलवलात तर तो आणखी उंच जाईल; पण परत खाली येईलच. उलट तसंच जोरानं आकाशात फेकलेलं अंतराळयान मात्र वर वर जात राहतं, अवकाशात जातं; पण परत खाली येत नाही.

असं का होतं? त्या चेंडूत आणि अवकाशयानात काय फरक असतो? कोणतीही वस्तू वर जाते तेव्हा तिला गुरूत्वाकर्षणाची ओढ जमिनीकडे खेचते. त्यामुळे वर जाणाऱ्या चेंडूवर उलट दिशेच्या म्हणजे जमिनीच्या दिशेच्या प्रवेगाचा प्रभाव पडतो. साहजिकच त्याचा वेग मंदावत राहतो आणि एका क्षणी त्या चेंडूनं कमाल उंची गाठलेली असते. कारण आता त्याच्यावर केवळ जमिनीच्या दिशेनं असणाऱ्या प्रवेगाचा प्रभाव पडून त्याचा जमिनीकडे झेपावण्याचा वेग वाढत जातो आणि तो चेंडू खाली पडतो.

गुरूत्वाकर्षणाच्या बलाची मात्रा आणि पृथ्वीच्या केंद्रबिंदूपासूनचं अंतर यांच्यातलं नातं व्यस्त असतं. म्हणजेच जसं ते अंतर वाढतं तशी गुरुत्वाकर्षणाच्या बलाची मात्रा घटते. अंतराच्या वर्गाच्या व्यस्त प्रमाणात ते नातं असल्यामुळे तर ते घटण्याचं प्रमाण जास्तच वाढत जातं. म्हणजे अंतर दुप्पट झालं तर बलाची मात्रा एकचतुर्थांश होते. त्यामुळे सुरुवातीलाच जास्त वेगानं एखादी वस्तू वर फेकली तर त्यावरच्या गुरूत्वाकर्षणाची ओढ कमी होते आणि त्याचा वेग मंदावण्याचं प्रमाणही घटत जातं. असाच त्या वस्तूचा वेग वाढवत नेला तर एक वेळ अशी येते, की तिचा वेग शून्यवत होतच नाही आणि साहजिकच ती जमिनीकडे झेपावण्याच्या प्रक्रियतेला खीळ बसते. या वेगाला मुक्तीवेग म्हणतात. त्याची मात्रा गुरुत्वाकर्षणाच्या बलाच्या मात्रेवर अवलंबून असते.

पृथ्वीवर या बलाची जी मात्रा आहे त्याच्यावर मात करत अवकाशात झेपावण्यासाठीचा मुक्तीवेग गणित करून काढता येतो. तो सेकंदाला ११.२ किलोमीटर किंवा ताशी साधारण ४०००० किमी इतका आहे. अंतराळयानाला स्थानापन्न व्हायचं असल्यामुळे तो किमान वेग गाठावा लागतो. अंतराळात पोहोचल्यानंतर त्याच्यावर इतर कोणत्याही बलाचा प्रभाव नसल्यामुळे ते सतत पुढं पुढं जातच राहतं. जेव्हा ते अंतराळयान दुसऱ्या ग्रहाच्या किंवा उपग्रहाच्या गुरुत्वाकर्षणाच्या कक्षेत येतं तेव्हा त्याच्यावर परत एकदा दुसऱ्या बलाचा प्रभाव पडतो त्यापायी त्याच्या वेगात घट होते. वेगातलं ते नुकसान भरून काढण्याइतपत उर्जा जर त्याला मिळाली तर मग ते यान त्या ग्रहावर न आदळता त्या ग्रहाभोवती प्रदक्षिणा घालत राहतं.

## सुसरीची साखर–पेरणी

एका नदीत खूप सुसरी राहत होत्या. त्या नेहमी मेल्यासारख्या एका ठिकाणी पडून राहत, आणि कोणी प्राणी पाणी पिण्यास आला, की क्षणात झडप घालून त्याला जबड्यात पकडून ठार मारुन खाऊन टाकीत.

असेच एकदा एक सुसर मेल्याचे सोंग घेऊन पाण्याखाली स्वस्थ पडून होती. तेवढ्यात पाणी पिण्यासाठी एक कुत्रा तेथे आला. येथे थोडे, तिथे थोडे, अशा प्रकारे पाणी पीत तो आपली तहान भागवू लागला. हे सावज काही आपल्या तावडीत सापडत नाही, असे पाहून ती सुसर पाण्यावर डोके काढीत म्हणाली, ''अरे मित्रा, एका ठिकाणी उभा राहून पाणी पी. घाई करुन पाणी प्यालास, तर तुला ठसका लागून आजारी पडशील की. हे बघ, माझ्याजवळ चांगले निर्मळ पाणी आहे. ये येथे. आज किती दिवस झाले, मला तुझ्याशी मैत्री करावी वाटते. तुझा स्वभाव फार चांगला आहे, असेही मला कळले. ये असा जवळ, म्हणजे तुला कडकडून भेटता तरी येईल.''

सुसरीची ही साखर–पेरणी ऐकून कुत्रा लांबूनच म्हणाला, ''बाई तुला लांबूनच नमस्कार करतो. खरे म्हणशील, तर तुझ्यामुळेच मला असे ठिकठिकाणी थोडे थोडे पाणी प्यावे लागते. कधी झडप घालून तू माझा मुडदा पाडशील, याचा काय नेम? तुझी मैत्री तुलाच लखलाभ होवो.'' असे म्हणत कुत्रा तेथून धूम पळाला.

**तात्पर्य :** इतरांच्या गोड बोलण्याला भाळू नये. आधी त्यातील खरे खोटेपणा पहावा.

## जीवन चक्र



पुरातन भारतात युधिष्ठिर नावाचे एक राजे होते. त्यांचा जन्म ज्या युगामध्ये होता तेव्हा आध्यात्मिक मुल्यांना अधिक महत्त्व होते. लोक सद्गुणांनी परिपुर्ण त्या काळात आध्यात्माला धन–दौलतपेक्षा अधिक महत्त्वपुर्ण मानले जात होते.

युधिष्ठिरांना आपल्या राजवटीतील शेवटच्या दहा वर्षांमध्ये एक बदल जाणवू लागला. लोक इंद्रिय सुखांमध्ये लिप्त होऊ लागले होते आणि त्यांनी आत्म्याचा आवाज एकणे बंद केले होते. युधिष्ठिरांना माहित होते की कलियुग येणार आहे.

एकदा युधिष्ठिर आपल्या दरबारामध्ये बसलेले होते. तेव्हा दोन व्यक्ती त्यांच्याजवळ त्यांची समस्या सांगायला आले. त्यांचा एकमेकांत काही मतभेद होता. तो संपवण्यासाठी ते राजाजवळ आले होते.

एक व्यक्ती म्हणाला, मी या मनुष्याकडून एक जमीन खरेदी केली होती. मी नंतर बघितले की तिच्यामध्ये एक खजिना गाडलेला आहे. मी त्याच्याकडून फक्त जमीनच खरेदी केली होती. त्यामुळे मी तो खजिना त्याला परत देवू इच्छितो. तो खजिना मी त्याच्याकडून खरेदी केला नव्हता म्हणून तोच त्याचा खरा मालक आहे.

युधिष्ठिर त्या व्यक्तीच्या ईमानदारीने खूश झाला कारण ज्याने जमीन खरेदी केली होती त्याने ज्याकडून खरेदी केली होती त्याला खजिना सापडल्याची बातमी सांगितली आणि तो त्याला खजिना परत देवू इच्छित होता.

ज्या व्यक्तीने जमीन विकली होती. तो म्हणाला, ''हे खरे आहे की खजिना माझा होता परंतु जेव्हा मी जमीन त्याला विकली तेव्हा त्या जमिनीचा आणि त्या जमिनीमध्ये जे काही आहे हा त्याचा मालक आहे. त्यामुळे मला वाटते की खजिना यानेच घ्यावा.

ज्या व्यक्तीने जमीन खरेदी केली होती तो म्हणाला, कृपया तुझा खजिना परत घे. मी माझ्या डोक्यावर हे पाप घेऊ इच्छित नाही. कारण मी ही वस्तू का घेवू जी वास्तविक माझी नाही.

विकणारा म्हणाला, बघ, मी तुला जमीनीबरोबर ते पण दिले जे जमीनीत होते. मी हा खजिना स्वीकारू शकत नाही, कारण की आता ती तुझी संपत्ती आहे. कृपया मला मोह, लोभाच्या खड्यात ढकलू नको. युधिष्ठिर या दोन्ही व्यक्तींच्या उच्च व्यवहाराने खूप प्रसन्न झाले.

ते दोघे म्हणाले, आमचे ह्या गोष्टीवर एकमत नाही की काय करावे. आम्ही दोघेही दुसऱ्या व्यक्तीला खजिना देवू इच्छितो. आम्ही या गोष्टींवर अनेक दिवसांपासन वाद–विवाद करीत आहोत. आणि आता, आम्हाला असे वाटते की तुम्ही या वादाबाबत निर्णय करावा.

युधिष्ठिरांनी परिस्थितीचा विचार केला आणि स्वतः स्वतःशीच म्हणाले, या दोन्ही व्यक्ती उत्कृष्ट व्यवहार दाखवीत आहे. मला दिसत आहे की कलियुग अजून आले नाही. मी वाट बघितली पाहिजे.

युधिष्ठिर त्यांना म्हणाले, मला असे वाटते की तुम्ही दोघे एका आठवड्यांतर परत माझ्याकडे या. म्हणून ते दोघे निघून गेले. एक आठवड्यानंतर दोघे परत आले. तेव्हा काहीतरी पुर्णपणे बदलेले होते. यावेळी जो दावा त्यांनी राजासमोर मांडला तो पूर्णपणे बदलला होता. आता ते दोघे म्हणत होते की खजिना दोघांना पाहिजे.

**(कृपाल आश्रम, अहमदनगर)**

## शुद्ध जीवन जीने के मंत्र

**वे बड़े ऑफ़ीसियल रहते थे**

इतनी सारी किताबें उनकी अलमारियों में थीं लेकिन कभी हमने वे अलमारियाँ खोलकर नहीं देखीं। भले, उनके साथ हम सालों साल रहे लेकिन कभी उनकी चीज़ों को हाथ नहीं लगाया। इन बातों में वे बड़े ऑफ़ीसियल रहते थे। वे कहते थे कि जिसका जिस चीज़ से जितना सम्बन्ध है, उतने तक रहना चाहिए। अगर उसका उस चीज़ से कोई तैलुक नहीं है तो, उस चीज़ के बारे में सोचना भी नहीं चाहिए। कभी हम कहते. भाई साहब, हम भी देखें, आपकी कौन–सी किताबें हैं, कौन–से वेद. शास्त्र, पुराण आदि हैं! कहते थे. नहीं। बाबा ने यह कहा है कि बच्चों को बाहर की किताबें नहीं पढनी हैं लेकिन मुझे आज्ञा दी है कि तुम पढ़ो और उनको ज्ञानयुक्त भावनाओं से लिखो और लिखकर यह साहित्य सब के पास जाये लेकिन सभी को ये सब पढने का अधिकार बाबा ने नहीं दिया। जो बाबा ने नहीं दिया तो मैं भी आपको नहीं दूंगा। तब से हमने कभी उनसे यह बात कही ही नहीं कि आपकी किताबें दिखाओ। बीसों अलमारियाँ भरी थीं लेकिन हमें कुछ भी पता नहीं था कि किस अलमारी में किताबें हैं, किस अलमारी में काग़ज़–पत्र हैं।

कई भाई–बहनें समझते हैं कि चक्रधारी बहन भाई साहब के पास रहती हैं, उन्हें कई गुप्त बातें मालूम होंगी। इसलिए मेरे से पूछते थे, यह बात वास्तव में क्या है? आपको भाई साहब ने बताया होगा लेकिन भाई साहब ऐसी बातें कभी भी हमें नहीं बताते थे। जो जरूरी है, वही बात बताते थे, बाक़ी जिसका हमसे सम्बन्ध नहीं, वह कभी नहीं सुनाते थे। हम उनको कहते थे, आपका पेट बहुत बड़ा है।

कई बार कोई–कोई बात वे आये हुए व्यक्ति को बता देते थे, तो हम कहती थी, भाई साहब, आपको यह बात उस व्यक्ति को सुनानी नहीं चाहिए थी। अगर उसने जाकर उसी व्यक्ति को बता दी तो? वो आपका नाम बतायेंगे कि जगदीश भाई ने ऐसा कहा। वे हँसकर कहते थे, मैं उस बात को डायरेक्ट सुना नहीं सकता हूँ लेकिन यह बात अमुक व्यक्ति तक पहुँचानी ज़रूरी है इसलिए मैं ऐसे व्यक्ति को सुनाता हूँ जो बात वहाँ पहुँचाये।

वे कभी अन्याय सहन नहीं करते थे। कहते थे, जिस यज्ञ का पौधा प्रभु ने लगाया है, जिस साकार बाबा ने अपना सब–कुछ स्वाहा करके इसको आगे बढ़ाया है, जिसके लिए जगदम्बा सरस्वती तथा दादियों ने, हम सबने इतना सारा सहन कर, मेहनत कर सब–कुछ किया है, उसको कहीं, किसी से नुकसान होता है तो मुझसे देखा नहीं जाता, सहा नहीं जाता। इसके लिए कोई बुरा मानता है, भले माने लेकिन कहना मेरा फ़र्ज़ बनता है और कहूँगा ज़रूर। ऐसी बातों से कई लोग उनको बुरा भी मानते थे लेकिन वे सदैव कहते थे, बड़ों के लिए मेरे मन में कभी भूलकर भी डिस–रिगार्ड नहीं आता। मैं कोई बात बोल देता हूँ इसलिए कि सब ठीक हो जाये लेकिन उनके प्रति मेरे मन में रिगार्ड नहीं है, स्नेह नहीं है– यह हो नहीं सकता। आप मेरे मन को खोलकर देखें, मैं उनके लिए जान और जीवन न्योछावर कर दें। अगर उन पर कोई संकट आ जाये, मुश्किलें आ जायें मैं उनके लिए जान लगा दूँ।

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

## स्त्री स्वास्थ्याचे कानमंत्र आरोग्य सखी

पंचकर्मामुळे अनेकदा अगदी दुर्धर, असाध्य अशा व्याधी बऱ्या होतात. जेव्हा पाच–सात दिवसांसाठी ॲन्टिबायोटीक्स घेतली जातात त्या वेळी त्याचा दुष्परिणाम शरीरास विशेष जाणवत नाही. परंतु जेव्हा वारंवार जंतुसंसर्ग होतो किंवा जास्त काळ टिकून राहतो अशा वेळी ॲन्टिबायोटीक्स जास्त दिवस घ्यावी लागतात. तेव्हा त्याचे दुष्परिणाम दिसून येतात ॲन्टिबायोटीक्स जंतूंचा नाश करते त्यामुळे आजार बरा होतो. त्याचबरोबर मोठ्या आतड्यातील शरीरास चांगले असलेले उपकारक बॅक्टेरियाही त्यामुळे नष्ट होतात. त्याचे दुष्परिणाम शरीरावर होतात.

उदाहरणार्थ, जुलाब, मळमळ, उलट्या, तोंड येणे, केस गळणे, अशक्तपणा वाटणे. एखादी मोठी शस्त्रक्रिया करण्यास सांगितली असेल, तर त्याआधी पंचकर्म उपचार करून बघावेत उदाहरणार्थ, गर्भाशय निर्हरण करण्याआधी पंचकर्म उपचार करून बघावेत. याने आजारावर नक्कीच मात करता येते. कारण गर्भाशय स्त्रीच्या शरीराला अत्यंत उपयुक्त असा अवयव आहे. याची शस्त्रक्रिया केल्यास स्त्रीच्या शरीरांमध्ये हार्मोन्सचे असंतुलन होऊन अनेक त्रासदायक लक्षणे निर्माण होतात. चिडचिड, अंगातून गरम वाफा निघणे, अशक्तपणा, हातापायांची आग होणे, घाम फुटणे, नैराश्य वाटणे ही सर्व लक्षणे गर्भाशय निर्हरण शस्त्रक्रिया केल्यानंतर दिसून येतात. हे टाळण्यासाठी पंचकर्म उपचार व आयुर्वेदिक औषधी उपचार करून बघावेत. यासाठी प्रथमतः पंचकर्म म्हणजे काय, हे जाणून घ्या.

आयुषः वेदः आयुर्वेदः।

ज्या शास्त्रामध्ये जीवनाविषयीचे ज्ञान सांगितले आहे, असे आयुर्वेद शास्त्र भारतीय संस्कृतीत उगम पावले आहे. पाश्चात्त्य देशांतसुद्धा मान्यताप्राप्त झालेले असे हे आयुर्वेद शास्त्र शरीराबरोबरच मनाचा विचार करते. त्याची महती सर्वदूर पसरली.

**(क्रमशः)**

**डॉ. शारदा निर्मळ–महांड्ळे**  
दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर  
अहमदनगर  
मोबाईल नं– ८७९३४००४००

# कॅलिडोस्कोप

## बहरल्या कुंदाच्या जाळ्या

**थं**डीचा आल्हाददायक ऋतूकाळ संपत आला की वेगळीच हुरहुर जाणवते. रणरणत्या उष्म्याची काहिली, त्या तप्त झळा, तापत्या भूमीची ती होरपळ नजरेसमोर तरळून जाते.



पण मनातले हे विचार दूर करतो तो असा अंगोपांगी फुललेला कुंद. कुंदाच्या बहरलेल्या जाळ्या, पसरणारा तो मंद दरवळ, हिरव्यागार पानांमधून डोकावणारी ती पांढरीशुभ्र फुलं बघितली की मन हरखून जातं. या फुलांशी साधर्म्य राखणारी आणि उन्हाळ्यालाही सुगंधित करणाऱ्या मोगरा, जाई, जुई यासारख्या फुलांचं स्मरण होतं आणि नकळत उन्हाळ्याच्या स्वागताला मन सज्ज होतं.

## घटस्फोटानंतर केली पार्टी!

**ल**ग्न हा आयुष्यातील एक अतिशय महत्त्वाचा आणि आनंदाचा क्षण असतो. दोन लोक लग्न करतात, तेव्हा त्यांचे आयुष्य पूर्णपणे बदलते. भारतीय परंपरेत लग्न हे केवळ नाते नसून सात जन्मांचा सहवास असल्याचे म्हटले जाते; पण कधी कधी असा जीवनसाथी सापडतो, ज्याच्यासोबत आयुष्य घालवणे अवघड होऊन बसते. आयुष्यात अनेकदा असे प्रसंग येतात. जिथे पती-पत्नीला वेगळे व्हावे लागते. घटस्फोट घ्यावा लागतो.

घटस्फोटानंतर लोकांना थोडे वाईट वाटते; पण एका महिलेने घटस्फोट घेतल्यानंतर घटस्फोटाची पार्टी केली. नातेसंबंध तुटलेल्या लोकांना सावरण्यासाठी थोडा वेळ लागतो; पण हे संबंध चांगल्यासाठी तुटले तर त्याचा आनंद देखील होतो. पतीपासून विभक्त झाल्यानंतर एका महिलेने तिच्या मित्र-मैत्रिणींसोबत घटस्फोटाची पार्टी केली.

घटस्फोटानंतर असा आनंद पहिल्यांदाच पाहायला मिळत आहे. भारतात घटस्फोटाचे प्रमाण खूपच कमी आहे. स्वीडनमध्ये घटस्फोटाचे प्रमाण ५४.९ टक्के आहे. अमेरिकेत ते ५४.८ टक्के आहे. भारतात हेच प्रमाण एक टक्का आहे.



## कारचालकाचे कौतुक

**स्व**र्ग आणि नरक एकत्र पाहायचे असेल तर पावसाळ्यात मुंबईला जा, असे म्हटले जाते. पुराचे पाणी भरून उध्वस्त होत चाललेले लोक हे नरकापेक्षा कमी नाही. अशा परिस्थितीत एका परदेशी महिलेने आश्चर्यकारक प्रतिक्रिया दिली. मुंबईत पावसामुळे पूरस्थिती होती. या सगळ्यात मुंबईतील एका उबेर ड्रायव्हरचे ड्रायव्हिंग कौशल्य पाहून एका ऑस्ट्रेलियन महिलेने आश्चर्य व्यक्त केले आणि म्हणाली की, भारतीयांपेक्षा कोणीही थंड नाही. रात्रीचे तीन वाजले होते आणि मला वेळेवर विमानतळावर पोहोचायचे होते. सर्वत्र पाणी होते आणि पूर परिस्थिती होती; पण माझा उबर ड्रायव्हर काही हरकत नाही म्हणाला. तो पुराच्या पाण्यात नागमोडी गाडी चालवत होता. जणू त्याच्या मागे शत्रू लागला आहे. ड्रायव्हरचे ड्रायव्हिंग कौशल्य पाहून महिलेने त्याचे खूप कौतुक केले. तिने सांगितले, की भारतातील लोक सर्वात मस्त आहेत. माझी फ्लाइट चुकण्याची अपेक्षा करत मी पुरात अडकले होते; पण माझ्या उबेर ड्रायव्हरने काळजीपूर्वक आणि वेळेवर पोहोचवले. तो पूर्ण आत्मविश्वासाने गाडी चालवत होता. पुरासारख्या पाण्यात गाडी चालवणारा ड्रायव्हर पाहून तो देवावरच्या श्रद्धेने गाडी चालवत आहे असे वाटत होते. कारण, पाण्याखाली खोल खड्डा असू शकतो, त्यात गाडी गेली तर मोठा अपघात होऊ शकतो. परंतु, अत्यंत सुखरूपपणे हा प्रवास झाला, अशा भावना ऑस्ट्रेलियन महिलेने व्यक्त केल्या.



## पत्नीचे लग्न लावले दिराशी!

उत्तर प्रदेशच्या जौनपूर येथे एक अजब लग्न पार पडले. येथे एका गर्भवती महिलेने चक्क आपल्याच दीरासह सप्तपदी घेत लग्न केले. विशेष म्हणजे नवऱ्या मुलाचा मोठा भाऊ आपल्या बायकोच्या लग्नात वराती म्हणून सहभागी झाला होता.

या महिलेचे आपल्याच दिराशी अनैतिक संबंध असल्याचे आरोप होते. पतीला याची माहिती मिळाली, तेव्हा त्याने पत्नीशी संबंध ठेवण्यास नकार दिला. तसेच होणारे हे मूल माझे नाही असे म्हणत तिला नांदवणार नाही असे सांगितले. जौनपूरच्या बिबीपूर गावात राहणाऱ्या शिरोमणी गौतम यांचा मुलगा बहादूर गौतमचे २६ मे २०२३ रोजी सरायखवाजा क्षेत्रात राहणाऱ्या सीमी गौतमशी लग्न झाले होते. अत्यंत थाटामाटात हिंदू पद्धतीने हे लग्न लागले होते. लग्नानंतर सीमा आपल्या सासरी नांदू लागली होती. कुटुंबात सगळे काही सुरळीत सुरू होते;पण काही दिवसांनी बहादूर गौतमने आपल्या आई-वडिलांना पत्नीचे आपला छोटा भाऊ सुंदर गौतमशी विवाहबाह्य संबंध असल्याचे सांगितले. यानंतर कुटुंबाच्या पायाखालची जमीनच सरकली होती.




आई-वडिलांनी मध्यस्थी करत बहादूर गौतमची मनधरणी करत त्याला शांत केले होते. यादरम्यान पत्नी सीमा गर्भवती होती. यानंतर मात्र बहादूरने तिचा स्वीकार करण्यास नकार दिला. गावात ठिकठिकाणी कुजबूज सुरु झाली होती. यानंतर नातेवाइकांच्या इच्छेनुसार, सीमा आणि गौतम यांनी कोर्ट मॅरेज केले. कोर्ट मॅरेज केल्यानंतर दोघांनी मंदिरात जाऊन सप्तपदी घेतली. मंदिरात पार पडलेल्या सीमा आणि सुंदर यांच्या लग्नात बहादूर गौतमही वराती म्हणून पोहोचला होता. या वेळी नातेवाइक आणि पाहुण्यांनी सीमा आणि सुंदर यांना आशीर्वाद दिला. या लग्नाची सध्या जोरदार चर्चा सुरू आहे.

## कबुतराची शिकार करणारा मासा

**मा**से कधी आकाशात उडणाऱ्या पक्ष्यांची शिकार करू शकतो का? या प्रश्नाचं उत्तर 'नाही' असंच द्यावं लागेल. पण निसर्गाची किमया न्यारीच आहे. व्हेल, शार्कसारखे मासे पाण्यातल्याच इतर सजीवांना खातात. पण एक प्रकारचा मासा कबुतराची शिकार करतो. म्हणूनच त्याला 'कॅटफिश' म्हणतात. हा व्हेल प्रजातीचा अत्यंत दुर्मीळ मासा आहे. जवळपास तीन वर्षांपूर्वी हा मासा भारतातल्या डोंगराळ भागात आढळला. त्याला पाहून शास्त्रज्ञांनाही आश्चर्याचा धक्का बसला. समुद्रात आढळणारा हा मासा डोंगराळ भागात कसा पोहोचला असा प्रश्न त्यांना पडला. या परिसरात त्यांनी आपली वसाहत निर्माण केल्याचं बोललं जात आहे. या माश्याचं आयुष्य दहा वर्षांपर्यंत असतं. त्याला 'डेव्हिल कॅट फिश'ही म्हणतात. बराच काळ शांत असणारा हा मासा शिकारीसाठी जाळं लावतो. पाठलाग करून जनावरांची शिकार करतो. हवेत उडणारी कबुतरं झेप घेऊन पकडतो. कबुतराची शिकार करतानाचे त्याचे व्हिडिओ व्हायरल झाले आहेत. त्याचं कबुतराच्या शिकारीचं कौशल्य बघून आपण अक्षरश: थक्क होतो.



## पाकिस्तान पहायचा तर...



**पा**किस्तान हा भारताचा शेजारी. भारत आणि पाकिस्तान एकमेकांचे शत्रू. असं असलं तरी या राष्ट्राबद्दल अनेकांना आकर्षण असतं. पाकिस्तानमध्ये असं पटकन जाता येत नाही. म्हणूनच वाघा सीमा तसंच जम्मू-काश्मीरमधून दिसणारा सीमाभाग पाहण्यासाठी भारतीय गर्दी करतात. पाकिस्तान नेमका कसा असेल, तिथल्या लोकांची भारताबद्दलची मतं काय याचीही आपल्याला उत्सुकता असते. पाकिस्तान पहायचा असेल तर तुम्ही अजून एका ठिकाणी जाऊ शकता. हे ठिकाण म्हणजे राजस्थानमधला मेहरानगड किल्ला. जोधपूरमधल्या या किल्ल्यातून आपण पाकिस्तानचा बराच भाग बघू शकतो. हा किल्ला ५०० वर्षं जुना असून फाळणीदरम्यान पाकिस्तानने त्यावर ताबा मिळवण्याचा प्रयत्न केल्याचं म्हटलं जातं. पण यात त्यांना अपयश आलं. १९६५ च्या भारत-पाक युद्धातही सर्वात आधी मेहरानगड किल्ल्याला लक्ष्य करण्यात आलं. जोधपूरचे तत्कालीन शासक राव जोधा यांनी १२ मे १४५९ मध्ये या किल्ल्याचा पाया रचला तर महाराज जसवंत सिंह यांनी तो बांधून पूर्ण केला. किल्ल्याच्या भिंती जवळपास १० किलोमीटर लांब आहेत. त्यांची उंचीही जास्त आहे. किल्ल्याला चार दरवाजे असून आत बरेच भव्य महाल, त्यांचे नक्षीकाम केलेले सुंदर दरवाजे तसंच जाळीदार खिडक्या पहायला मिळतात. चामुंडा देवी इथल्या शासकांची कुलदेवता. तिच्याच आशिर्वादाने हा किल्ला भारताच्या ताब्यात राहिला, अशी लोकांची श्रद्धा आहे. राव जोधाने १४६० मध्ये या किल्ल्याजवळ छानसं मंदिर बांधून त्यात चामुंडा मातेच्या मूर्तीची स्थापना केली.

## ...इथे आहेत महाभारतातल्या खुणा

**भा**रतातल्या विविध शहरांचं, गावांचं पुराणकाळाशी नातं आहे. काही ठिकाणी पुराणकाळातल्या खुणा आजही सापडतात. उत्तराखंडमधलं माणा हे सुद्धा असंच एक गाव. भारत-चीन सीमेलगतचं हे गाव भारतातलं शेवटचं गाव म्हणून ओळखलं जातं. हे गाव बद्रीनाथपासून अवघ्या चार किलोमीटर अंतरावर असून पांडव याच गावातून स्वर्गात गेले होते, असं म्हटलं जातं. निसर्गसौंदर्याने नटलेलं हे गाव समुद्रसपाटीपासून १९ हजार किलोमीटरवर वसलं आहे. मणिभद्र या देवतेच्या नावावरून हे स्थान माणा म्हणून ओळखलं जातं. हे स्थान अत्यंत पवित्र असल्याचं मानलं जातं. या गावाला भगवान शंकराचा कृपाशिर्वाद लाभल्यामुळे इथे येणाऱ्यांची गरीबी दूर होते, असंही म्हटलं जातं. याच कारणामुळे माणाला पर्यटकांची गर्दी



झाल्याचं पहायला मिळतं. या ठिकाणी महाभारतकालीन पूलही पहायला मिळतो. भीम पूल या नावाने ओळखला जाणारा हा पूल माणाच्या प्रमुख आकर्षणांपैकी एक. पांडवांनी या पूलावरून स्वर्गाकडे प्रस्थान केल्याचं म्हटलं जातं. स्वर्गात जाण्यासाठी त्यांनी सरस्वती नदीकडे मार्गाची मागणी केली. मात्र ही मागणी पूर्ण न झाल्याने भीमाने रागात दोन भलेमोठे पाषाण उचलून नदीवर ठेवले. याच दगडांवरून पांडव स्वर्गाच्या दिशेने गेले. या गावात व्यास गुहाही आहे. या स्थानी महर्षी वेद व्यास रहात असत. या गुहेची रचना खूपच वेगळ्या पद्धतीची आहे. या दगडांच्या रचनेमुळे पुस्तकांची पानं एकावर एक ठेवल्यासारखं वाटतं. त्यामुळे या गुहेला व्यास पोथी असंही म्हटलं जातं.

## अशी ही हाडं!



**मा**नवी शरीरातल्या विविध अवयवांपैकी हाडं हा अत्यंत महत्त्वाचा भाग. या हाडांविषयीची माहिती चांगलीच रंजक आहे. हाडांमुळे मानवी शरीराचा प्राथमिक साचा तयार होतो. हाडांमुळेच त्वचेला आधार मिळतो.

जन्माच्या वेळी माणसाच्या शरीरात जवळपास ३०० हाडं असतात. वय वाढू लागल्यावर त्यांची संख्या कमी होत जाते. प्रौढ माणसाच्या शरीरात २०६ हाडं असतात. वय वाढताना कवटीतली हाडं एकमेकांमध्ये गुंतल्याने त्यांची संख्या कमी होते. हाडांमुळेच आपण हातांची हालचाल करू शकतो. दोन्ही हातांमध्ये प्रत्येकी २७ हाडं असतात. विशेष म्हणजे माणसाचे हात आणि पायांच्या हाडांची संख्या त्याच्या शरीरातल्या एकूण हाडांच्या जवळपास निम्मी म्हणजे १०६ असते. आपल्या हाडांमध्ये स्पंजसारखे टिश्यू असतात. एक हाड मोडल्यानंतर त्याच्या आसपासच्या इतर हाडांच्या कार्यावर परिणाम होतो. कानाच्या आतलं हाड हे शरीरातलं सर्वात लहान तर मांडीचं हाड सर्वात लांब आणि मोठं असतं. इतकंच नाही, तर हे हाड सर्वात बळकटही असतं. गळ्यातलं 'हायोइड' नावाचं हाड कोणत्याही सांध्याशी जोडलेलं नसतं. अशा प्रकारचं हे एकमेव हाड असून जिभेचं स्थान टिकवून ठेवण्यात त्याची महत्त्वाची भूमिका असते. गुडघ्याचा सांधा शरीरातला सर्वात मोठा सांधा आहे. या सांध्याशी तीन बळकट हाडं जोडलेली असतात. वाढत्या वयानुसार हाडं ठिसूळ होत जातात. हाडांची बळकटी टिकवून ठेवण्यासाठी कॅल्शियमयुक्त आहार घेणं गरजेचं असतं. आपल्या हालचालींवर कोणतीही बंधनं येऊ नयेत, यासाठी हाडांचं आरोग्य राखावं लागतं.

## बॉडीबिल्डिंगचा जादूगार

**बॉ**डीबिल्डिंग म्हणजे शरीरसौष्ठव. शरीरसौष्ठवासाठी बरीच मेहनत घ्यावी लागते. पीळदार शरीर कमवावं लागतं. शरीरसौष्ठवासाठी अंगात जोम असावा लागतो. त्यामुळे तरुण मंडळीच या खेळाकडे वळतात. पण अमेरिकेतले जिम एरिंग्टन गेल्या ७० वर्षांपासून शरीरसौष्ठवाशी संबंधित स्पर्धांमध्ये सहभागी होत आहेत. वयाच्या ८८ व्या वर्षीही त्यांचा उत्साह तरूणांना लाजवणारा आहे. सर्वात वयस्कर बॉडीबिल्डर म्हणून 'गिनिज बूक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डस'मध्ये त्यांची नोंद करण्यात आली असून अनेकजण त्यांच्याकडून प्रेरणा घेतात. जानेवारी महिन्यात जीममध्ये तंदुरूस्तीचा संकल्प करणाऱ्यांची गर्दी झालेली असते. फेब्रुवारी येईपर्यंत बोटावर मोजण्याइतके लोक नियमित जीममध्ये येतात. अशांनी एरिंग्टन यांच्याकडून बरंच काही शिकायला हवं. वयाच्या पंधराव्या वर्षापासून त्यांनी बॉडीबिल्डिंगला सुरूवात केली. ५० वर्षांपेक्षा अधिक काळ ते आठवड्यातून किमान तीन वेळा तरी कसरत करतात. वय वाढल्यानंतरही त्यांचा नेम चुकत नाही. २०१७ च्या गिनिज बुकच्या आवृत्तीत जगातले सर्वात वयस्कर व्यावसायिक बॉडीबिल्डर म्हणून त्यांची नोंद झाली आहे. विविध स्पर्धांमध्ये ते सहभागी होतात आणि जिंकतातही. अर्थार्जनासाठी ते सेल्समन म्हणून काम करायचे. पण आता ते यू ट्यूब स्टारही आहेत. कसरती शिकवणाऱ्या त्यांच्या व्हिडिओंना जगभरातून मागणी आहे. १९७८ मध्ये वयाच्या ४५ व्या वर्षी त्यांनी ४० वर्षांपुढील लोकांसाठी असलेल्या 'मिस्टर अमेरिका' स्पर्धेत भाग घेतला. इथूनच त्यांच्या आयुष्याला कलाटणी मिळाली. या स्पर्धेत ते उपविजेते ठरले. पण सर्वात पीळदार स्नायूंचं बक्षिस त्यांना मिळालं. यानंतर जिम यांनी मागे वळून पाहिलं नाही. वयाच्या ८४ व्या वर्षीही ते खूप उत्साही आणि कार्यरत आहेत. वय वाढलं तरी प्रत्येकाने आनंदी आणि उत्साही असायला हवं. जिम आपल्याला हाच संदेश देतात.



## सफर जगातल्या चिमुकल्या देशांची

**आ**पला भारत खंडप्राय: देश आहे. काश्मीरपासून कन्याकुमारीपर्यंत पसरलेल्या भारताचं क्षेत्रफळही खूप जास्त आहे. मात्र जगात छोटेखानी देशांची कमतरता नाही. काही देश तर आपल्याकडच्या शहरांपेक्षाही लहान आहेत. चला तर मग, अशाच काही देशांची ओळख करून घेऊ.



* 'सेंट किट्स' आणि 'नेविस' हा कॅरेबियन समुद्रामधला द्विपसमूह म्हणजे एक देश आहे. १४९८ मध्ये ख्रिस्तोफर कोलंबसने ही सुंदर बेटं शोधली. १९८३ मध्ये स्वतंत्र झालेल्या या दोन्ही बेटांचं एकूण क्षेत्रफळ २६१ चौरस किलोमीटर असून 'सेंट किट्स' १६८ चौरस किलोमीटर तर 'नेविस'९३ चौरस किलोमीटर क्षेत्रात पसरला आहे. या बेटांची लोकसंख्या ५० हजारच्या आसपास आहे.



* ऑस्ट्रिया आणि स्वीत्झरलँड या दोन देशांच्या मध्यभागी वसलेला देश म्हणजे 'लिचटेन्स्टिन'. याचं क्षेत्रफळ अवघं १६० चौरस किलोमीटर असून ४० हजारांची लोकसंख्या आहे. इथे बेरोजगारीचं प्रमाण नगण्य असून सकल राष्ट्रीय उत्पन्नाचा विचार केल्यास हा जगातला सर्वात श्रीमंत देश आहे.

*'माल्टा' हा भूमध्य सागरातला सात बेटांचा समूह आहे. हा देश अवघ्या ३१६ चौरस किलोमीटर परिसरात पसरला आहे. या देशात साडेचार लाख लोक राहतात. माल्टाला १९६४ मध्ये स्वातंत्र्य मिळालं.



* 'नॉरू' नावाचाही एक देश आहे. हा देश म्हणजे एक बेट आहे. इथली लोकसंख्या अवघी नऊ हजार असून इथे फॉस्फेटच्या खाणी होत्या. हेच या देशाचं उत्पन्नाचं प्रमुख साधन होतं. इथे नारळाचं उत्पादनही मोठ्या प्रमाणावर होतं.

# जिल्हा परिषद परिचर कर्मचारी संघटनेच्या जिल्हाध्यक्षपदी निलेश गाडेकर तर सचिवपदी अनुप गायकवाड यांची निवड

नगर – महाराष्ट्र राज्य जिल्हा परिषद परिचर कर्मचारी संघटनेच्या अहमदनगर जिल्हाध्यक्षपदी निलेश गाडेकर तर सचिवपदी अनुप गायकवाड यांची निवड झाली आहे. संघटनेचे राज्य कार्याध्यक्ष अशोक काळापहाड यांच्या उपस्थितीत व चंद्रकात पाचारणे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या जिल्हा शाखेच्या बैठकीत एकमताने नूतन कार्यकारिणी निवड करण्यात आली.



जिल्हा परिषद परिचर कर्मचारी संघटनेच्या अध्यक्षपदी निलेश गाडेकर व अनुप गायकवाड यांची सचिवपदी निवड झाल्याबद्दल त्यांचा सत्कार करताना राज्य व जिल्हा कार्यकारिणीचे पदाधिकारी.

यात कार्याध्यक्षपदी ऋषिकेश बनकर, खजिनदार अनघा कुलकर्णी, जिल्हा महिला उपाध्यक्ष आशा मिसाळ, उपाध्यक्ष (मुख्यालय) अनिल येनगुल, उपाध्यक्ष (उत्तर) अशोक अरूण, उपाध्यक्ष (उत्तर) विजय घुले, जिल्हा संघटकपदी रवींद्र रोकडे, जिल्हा महिला संघटक भारती जाधव, सहसचिव बाळासाहेब डफळ, प्रसिध्दी प्रमुख श्रीकांत ढगे तर जिल्हा सल्लागारपदी लहानू उमाप यांची निवड करण्यात आली आहे.

बैठकीस सुरेश भोजने, अक्षय म्हस्के, अश्विनी आगरकर, सुरेखा भोजने, महेश जाधव, जयेश शिंदे, संध्या फसले, दाणे राजेंद्र, सदाशिव वाळुंज, निवृत्ती काळे, हनुमंत लाकुडझोडे, विजय वाबळे, सुरेश माळवदे, संजय गायकवाड, माने संगिता, दादा बरबडे, रविंद्र मांडगे, आशा गुंजाळ, सोपान जाधव,दिपाली पवार, उषा तोगे, गोरख कदम, शरद पवार, इंद्रभान गावडे, राहुल साळवे, आदिनाथ मोरे, सचिन चितळे, निलेश गोरे, हिवाळे बी. बी, संजय कदम, आव्हाड एस एच, मंगेश केळगंद्रे, प्रकाश धोत्रे, यास्मिन शेख, विजय थोरात, दत्तात्रय भोर, सोमनाथ त्रिमुखे, प्रदिप झोडगे, किशोर फुलारी, सुषमा घाटपांडे व इतर अनेक परिचर बंधू आणि भगिनी उपस्थीत होते.

पशुधन पर्यवेक्षक आणि कनिष्ठ सहाय्यक लिपिक व कनिष्ठ सहाय्यक लेखापदावर पदोन्नती झालेल्या परिचर कर्मचाऱ्यांचा संघटनेच्यावतीने सत्कार करण्यात आला. यांचा संघटने तर्फे प्रमाणपत्र, शाल व पुष्पगुच्छ देवून सत्कार करण्यात आला.

जिल्हाध्यक्ष निलेश गाडेकर म्हणाले, सर्व सभासदांनी विश्वासाने जिल्हाध्यक्षपदाची जबाबदारी सोपवली आहे. मागील अध्यक्षां–प्रमाणे मी सुध्दा परिचर संवर्गाचे विविध प्रश्न मार्गी लावण्याचा प्रयत्न करेल. आश्वासित प्रगती योजना, पदोन्नती संदर्भात योग्य पाठपुरावा करण्यात येईल. तसेच सर्वांना सोबत घेवून काम करण्यावर भर दिला जाईल.

सचिव अनुप गायकवाड म्हणाले, परिचर संवर्गाचे अनेक प्रश्न प्रलंबित आहेत. संघटनेची मजबूत ताकद उभी करून विविध प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी पाठपुरावा करण्यात येईल. सचिवपदी काम करताना सगळ्यांशी विचारविनिमय करून धोरण ठरवले जाईल. तालुका संघटना बळकट करण्यावर भर देण्याची ग्वाही त्यांनी दिली.


पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांच्या पुण्यतिथी निमित्त विचार भारतीच्या वतीने आयोजित शालेय व्याख्यानामध्ये विविध शाळांमध्ये विद्यार्थ्यांनी अहिल्यादेवींची वेशभूषा करुन सहभाग घेतला.

# हजारो विद्यार्थ्यांनी ऐकले अहिल्यादेवींचे चरित्र

## विचार भारतीच्या शालेय व्याख्यान उपक्रमास शहरातील शाळांचा प्रतिसाद

नगर – ज्या जिल्ह्याचे नाव आता अहील्यानगर झाले आहे त्या अहिल्यादेवी कोण होत्या, त्यांचे शौर्य व कार्य नव्या पिढीला कळण्यासाठी विचार भारतीच्या वतीने नगर शहरातील विविध शाळांमध्ये अहिल्यादेवींच्या चरित्रावर शालेय व्याख्यानांचे आयोजन करण्यात आले होते. पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांच्या पुण्यतिथी निमित्त झालेल्या या उपक्रमास शहरातील शाळांनी प्रतिसाद देत आपापल्या शाळांमध्ये व्याख्यानांचे आयोजन केले. या उपक्रमात हजारो विद्यार्थ्यांनी अहिल्यादेवींचे चरित्र ऐकून त्यांचे विचार आत्मसात केले, अशी माहिती उपक्रमाचे प्रमुख प्रशांत आढाव यांनी दिली.

१३ ऑगस्ट रोजी पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांच्या पुण्यतिथी निमित्त विचार भारतीच्या वतीने झालेल्या शालेय व्याख्यानांमध्ये शाळेतील शिक्षकांनी विद्यार्थ्यांना अहिल्यादेवींचा जीवनपट उलगडून त्यांच्या जीवन कार्याचा परिचय उगवत्या पिढी समोर मांडला. त्यामुळे नकळत उमलत्या मनावर संस्कार कोरले गेले. या उपक्रमात अनेक विद्यार्थिनींनी अहिल्यादेवींची वेशभूषा करून सहभाग घेत वक्तृत्व केले. शाळांमधील मुख्याध्यापक, शिक्षक व सर्व कर्मचाऱ्यांनी विचार भारतीच्या उपक्रमास सहकार्य केले, अशी माहिती विचार भारतीचे सचिव सुधीर लांडगे यांनी दिली.

या उपक्रमात विचार भारतीचे अभय आगरकर, श्रीगोपाल जाखोटिया, महेंद्र जाखेटे, प्रा.ऐश्वर्या सागडे, अंकुश गोळे, विशारद पेटकर, रवींद्र बारस्कर, डॉ. विक्रम डीडवानिया, चंद्रकांत तागड, उदय भणगे, राजेंद्र पाचे, सुनील नागोरी, डॉ.नीलकंठ ठाकरे आदींनी विविध शाळांमध्ये हा उपक्रम यशस्वी होण्यासाठी सहकार्य केले.


श्रावणी सोमवार निमित्त चितळे रोड येथील श्री महाकाल ग्रुपच्यावतीने महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते.

# श्री महाकाल ग्रुपच्या महाप्रसादाचा घेतला अनेक भाविकांनी लाभ

नगर – श्रावणी सोमवार निमित्त चितळे रोड येथील श्री महाकाल ग्रुपच्यावतीने महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी सुमित धेंड, रवि दंडी, राजु इगे, अभिषेक इगे, अभिजित येनगंदूल, अमोल येनगंदूल, अनिकेत देशपांडे, अक्षय वल्लाकट्टी, विशाल ठाकूर, अषिश क्षिरसागर, पंकज धेंड, विनोद बुरा, राहुल इगे, प्रवण गुंटूक, आकाश गुर्रप, विशाल बोल्ली, प्रवण बोज्ञा, राजु म्याना, प्रथमेश बोज्ञा, सागर इगे,गणेश इपलपेल्ली आदि उपस्थित होते.

याप्रसंगी सुमित धेंड म्हणाले, श्रावण महिन्यात भगवान शंकराची पुजाअर्चा याला मोठे महत्व आहे. श्री महाकाल ग्रुपच्यावतीने श्रावण मासानिमित्त विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येत असतात. श्रावणी सोमवारनिमित्त भाविकांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले.

तसेच भगवान शंकराची भव्यमूर्ती, आकर्षक सजावटीने संपूर्ण परिसर भक्तीमय झाला होता. ग्रुपमधील अनेक सदस्य हे नियमित उज्जैन महाकालच्या येथील मंदिरा येथे जात असतात, ग्रुपच्यावतीने विविध कार्यक्रमातून एक वेगळी अनुभती देण्याचा प्रयत्न केला असल्याचे सांगितले.

यावेळी रवि दंडी यांनी ग्रुपच्यावतीने राबविण्यात येत असलेल्या उपक्रमांची माहिती दिली. महादेव भक्तांसाठी नियमित कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येईल, असे सांगितले.

# ब्राह्मणीच्या छत्रपती शाहू महाराज निवासी वसतीगृहातील निराधार व गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप

नगर – गरजू व निराधार विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने ब्राह्मणी (ता. राहुरी) येथील छत्रपती शाहू महाराज निवासी वस्तीगृहातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. वस्तीगृहाच्या दुसऱ्या स्थापना दिनानिमित्त हा सामाजिक उपक्रम राबविण्यात आला.


ब्राम्हणीच्या छत्रपती शाहू महाराज निवासी वसतीगृहातील निराधार विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करताना सहाय्यक पोलिस निरीक्षक चारुदत्त खोंडे व निवासी नायब तहसीलदार संध्याताई दळवी आदी.

राहुरी पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक चारुदत्त खोंडे व राहुरीचे निवासी नायब तहसीलदार संध्याताई दळवी यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले.

यावेळी एलसीबीचे ज्ञानेश्वर शिंदे, ब्राह्मणीचे उपसरपंच गणेश तारडे, ग्रामपंचायत सदस्य शांताराम हापसे, महेंद्र तांबे, प्रियंका आंबेडकर, नाथपंथी गोसावी समाज अध्यक्ष सर्जेराव शेगर, जनार्दन चिंचने, दयानंद सावंत, टायगर ग्रुपचे नेवासा तालुकाध्यक्ष बाबाभाऊ शिंदे, संस्थेचे संस्थापक अध्यक्ष मोहन शिंदे, उपाध्यक्ष शिवाजी शेगर, सचिव अनिल सावंत, रोहित सावंत, वस्तीगृह अधीक्षक संतोष चव्हाण, विजय शेगर, बाबाजी सावंत, सागर सावंत, विशाल शेगर, शिवाजी शिंदे, करण शिंदे आदी उपस्थित होते.

सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक चारुदत्त खोंडे म्हणाले की, छत्रपती शाहू महाराज निवासी वस्तीगृहाच्या माध्यमातून गरजू घटकातील विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी आधार मिळत आहे. आजची मुले ही भविष्यातील समाजाचे भवितव्य आहे. शिक्षणातून आपले उज्वल भवितव्य घडविण्याच्या दृष्टीकोनाने त्यांना आधार देण्याचे कौतुकास्पद कार्य सुरु आहे. संघर्षातूनच मनुष्य घडत असतो. ध्येयाने प्रेरित होऊन त्या दिशेने वाटचाल करण्याचे त्यांनी आवाहन केले.

निवासी नायब तहसीलदार संध्याताई दळवी यांनी आर्थिक दुर्बल घटकातील विद्यार्थी वसतिगृहात राहून शिक्षणाने आपले भवितव्य घडवित आहे. मंदिरापेक्षा अशा ज्ञानमंदिरातून समाजाची जडणघडण होणार असल्याचे त्यांनी सांगितले. या कार्यक्रमात वस्तीगृह चालविणाऱ्या संस्थेला आर्थिक मदत देण्यात आली.

# 'सारे जहाँ से अच्छा हिंदोस्ता हमारा' कार्यक्रमास न्यू आर्टस्‌मध्ये विद्यार्थ्यांचा प्रतिसाद

## न्यू आर्टस्‌ मधील बीबीए व बीबीए (आयबी) विभागाचा उपक्रम

नगर – न्यू आर्टस्, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज अहमदनगर येथील बीबीए व बीबीए (आयबी) विभागाने स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून सारे जहाँ से अच्छा हिंदोस्ता हमारा संगीत मैफिल आयोजित केली होती. यावेळी न्यू आर्टस् कॉलेजचे प्राचार्य डॉ. बाळासाहेब सागडे यांनी या देशभक्तीपर संगीतमैफिलीला शुभेच्छा दिल्या व तरुणाई मध्ये राष्ट्रभक्तीची बिजे रुजण्यासाठी यासारखी संगीत मैफिल व त्याचे महत्त्व अधोरेखित केले. तसेच भारत राष्ट्रांनी आपल्याला जे जे काही दिले याची जाणीव विद्यार्थ्यांमध्ये होणे गरजेचे आहे असे नमूद केले.



बीबीए विभाग आयोजित सारे जहाँ से अच्छा हिंदोस्ता हमारा या कार्यक्रमात दीपप्रज्वलन करताना न्यू आर्टस् महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बाळासाहेब सागडे. समवेत बीबीए विभागप्रमुख डॉ. मंगेश वाघमारे, उपप्राचार्य डॉ. अनिल आठरे, अवधूत मोबाईलचे संचालक अजित पवार, पवन बोंदर्डे.

प्रा. डॉ. मंगेश वाघमारे (विभाग प्रमुख बीबीए व बीबीए (आयबी)) यांच्या संकल्पनेतून व कल्पनेतून देशभक्तीपर संगीत मैफिलचे आयोजन करण्यात आले होते. भारत देश महान आहे, होता आणि राहील जगातील सर्वात मोठा लोकशाही देश आज विविध स्तरावर प्रगती करत असल्याचे डॉ. मंगेश वाघमारे यांनी यावेळेस सांगितले व विद्यार्थ्यांनी यामध्ये खारीचा वाटा उचलावा असे आवाहन केले. तसेच विद्यार्थ्यांनी देशाचे चांगले नागरिक होण्यासाठी प्रयत्न करावे असे नमूद केले.

प्रा. डॉ. मंगेश वाघमारे यांनी विद्यार्थ्यांना दरवर्षी या कार्यक्रमाचे आयोजन स्वातंत्र्य दिनाच्या पूर्वसंध्येला करण्यात येईल असे सांगितले. विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे देशभक्तीपर गीते गाण्याचा आग्रह गिरीराज व त्याच्या टीमला धरला त्यामुळे या कार्यक्रमाला एक वेगळीच रंगत आली. सारे जहांसे अच्छा, सुनो गौरसे दुनियावालो, जहा डाल डाल पर या गाण्यांनी विद्यार्थ्यांची मने जिंकली.

या कार्यक्रमाचे सुखयोगाचे फाऊंडर सागर पवार, रेडिओ ऑरेंजचे पवन बोंदर्डे, विजय नवले उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. अनिता पोतदार यांनी केले तर आभार प्रा. अभिजित सातभाई यांनी केले. व्यवस्थापन डॉ. राहुल थोरात यांनी केले.

# स्वातंत्र्य दिनानिमित्त 'दिल है हिंदुस्तानी' कार्यक्रमाचे आयोजन

नगर – स्वातंत्र्य दिनानिमित्त दिल है हिंदुस्तानी या देशभक्ती गीतांचा कार्यक्रम येथील पी. आर. मिडिया व ऑरेंज इव्हेंटस यांच्या वतीने आयोजित करण्यात आला आहे. १७ ऑगस्ट रोजी हा कार्यक्रम येथील माऊली सभागृहात सायंकाळी ६ वाजता सादर होणार आहे.

गेल्या सहा वर्षापासून या कार्यक्रमाच ऑर्केस्ट्रा स्वरझंकारच्या माध्यमातून आयोजन करण्यात येते. या कार्यक्रमात देशभक्ती गीतांच्या माध्यमातून देशाच्या स्वातंत्र्याचा इतिहास मांडण्याचा प्रयत्न केला जाणार आहे, अशी माहिती अ‍ॅड. सचिन चंदनशिव यांनी दिली.

या संगीत मैफलीत सुमधुर हिंदी–मराठी देशभक्ती गीतांचा नजराना रसिक प्रेक्षकांना अनुभवायला मिळणार आहे. या प्रसंगी चित्रशिल्पकार प्रमोद कांबळे हे व्यासपीठावर लाईव्ह चित्र रेखाटन करणार आहेत.

या कार्यक्रमात प्रा.आदेश चव्हाण, नितीन निंबाळकर, राहुल सिसोदिया, नरेंद्र साळवे, पल्लवी खरात, रेणुका पवार, नरेश बडेकर, जालिंदर शिंदे हे कलाकार गाणी सादर करणार आहेत. अजय साळवे, निलेश सोज्वळ, किरण खरात, संजय आठवले, एडविन पेरेपाडम, सिद्धांत गायकवाड, विशाल बोर्डे हे कलाकार साथ संगत करणार आहेत.

कार्यक्रमाचे निवेदन रियाज पठाण, उद्धव काळापहाड, पूनम कदम करणार आहेत. कार्यक्रम सर्वांसाठी खुला असून प्रथम येणारास प्रथम प्राधान्य असेल. कार्यक्रमाच्या मोफत प्रवेशिका नागेबाबा मल्टिस्टेट, नागेबाबा हाउस, झोपडी कॅन्टीन येथे उपलब्ध असून कार्यक्रमाचा लाभ घ्यावा असे आवाहन संयोजक रियाज पठाण व जालिंदर शिंदे यांनी केले आहे.

अधिक माहितीसाठी ९८८१७२५६९६, ९८२२६४७८१५.



विळद घाट येथील डॉ. विखे पाटील कृषी महाविद्यालय व उत्तरप्रदेश टेस्टबुक एज्यु सोल्यशन प्रा. लि. यांच्यात सामजस्य करार झाला. याप्रसंगी आशिष वाडेकर, प्राचार्य डॉ. एम. बी. धोंडे कंपनीचे प्रतिनिधी, प्राध्यापक आदी. (छाया – विजय मते)

# डॉ. विखे पाटील कृषि महाविद्यालय व टेस्टबुक एज्यु. सोल्युशन प्रा.लि. यांच्यात सांमजस्य करार

नगर – विळद घाट येथील डॉ. विठ्ठलराव विखे पाटील फौंडेशनचे कृषि महाविद्यालय व उत्तरप्रदेश येथील टेस्टबुक एज्यु सोल्युशन प्रा. लि. यांचेमध्ये विद्यार्थ्यांसाठी सामजस्य करार करण्यात आलेला आहे. यामध्ये महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना राष्ट्रीय, राज्यस्तरीय स्पर्धा परीक्षा, सरळसेवा परीक्षा, प्रशासकीय सोबतच वनविभागातील स्पर्धात्मक प्रशिक्षण आणि आयबीपीएस बँकींग इतर क्षेत्रात संधी असणा–या विविध परीक्षाचे ऑनलाईन प्रशिक्षण देण्यात येणार आहे. यामध्ये मॉकटेस्ट, टेस्टसीरीज घेण्यात येणार असून त्याव्दारे विद्यार्थ्यांना विविध क्षेत्रातील पर्याय निवडण्याची संधी देण्यात येणार आहे व नंतर त्या अनुषंगाने तज्ञाचे मार्गदर्शन व व्याख्यान आयोजीत केले जाणार आहे.

सध्या १ वर्षाकरीता विद्यार्थ्यांसाठी पूर्णपणे मोफत प्रशिक्षण दिले जाणार आहे. या करारावर टेस्टबुक एज्यु सोल्युशन प्रा. लि.चे अशिष वाडेकर व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एम. बी. धोंडे यांनी स्वाक्षऱ्या केल्या आहेत.

यावेळी बोलताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. धोंडे म्हणाले की, जीवनात यशस्वी होण्यासाठी अथक परिश्रम, अभ्यासात सातत्य, जिद्द, चिकाटी या गोष्टी महत्वाच्या असून स्पर्धेच्या युगात प्रशिक्षणाव्दारे सातत्य ठेवून आपले स्वप्न पूर्ण करावीत. तसेच विद्यार्थ्यांनी या ऑफलाईन/ऑनलाईन कोर्सचा फायदा नियमित अभ्यासक्रम सांभाळून उचित ध्येय पूर्ण करण्यासाठी नक्कीच होईल, असे डॉ. धोंडे म्हणाले.

उपक्रमास महाराष्ट्र राज्याचे महसूल व दुग्धविकास मंत्री राधाकृष्ण विखे पाटील व संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी व माजी खासदार डॉ. सुजय विखे पाटील यांनी शुभेच्छा दिल्या.

उपक्रम यशस्वीतेसाठी संस्थेचे प्रभारी सेक्रेटरी जनरल डॉ. पी.एम. गायकवाड, उपसंचालक (तंत्र) प्रा. सुनिल कल्हापुरे, यांचे मार्गदर्शन लाभले.

### बारामती येथे झालेल्या महाराष्ट्र राज्य अजिंक्यपद कराटे स्पर्धेमध्ये

# अहिल्यानगर कराटे असोसिएशनच्या खेळाडूंनी पटकावली प्रथम क्रमांकाची ट्रॉफी

नगर – नुकत्याच झालेल्या महाराष्ट्र राज्य अजिंक्यपद स्पर्धेसाठी अहिल्यानगर कराटे असोसिएशनच्या वतीने २१ जुलै रोजी जिल्हा निवड चाचणीचे आयोजन केले होते. यामध्ये २०० हून अधिक विद्यार्थ्यांनी निवड स्पर्धेसाठी सहभाग नोंदवीला होता. व १० व ११ ऑक्टोबर रोजी होणाऱ्या महाराष्ट्र राज्य अजिंक्यपद स्पर्धेसाठी अहिल्यानगर कराटे असोसिएशनच्या वतीने घेतलेल्या स्पर्धेतून ७० हून अधिक खेळाडू निवडून राज्य स्पर्धेसाठी खेळवले गेले व ५० हून अधिक खेळाडूंनी काता व कुमिते या प्रकारामध्ये अनेक पदकांची लयलूट केली आहे मुलांमध्ये काता प्रकरात अरमान शेख कांस्य तर कुमिते प्रकारात रेहान पटेल कांस्य व रौप्य, आदित्य घुमरे कांस्य व कांस्य, अथर्व जाधव कांस्य व कांस्य, प्रणव दराडे कांस्य व रौप्य, समर्थ सूर्यवंशी सुवर्ण व रौप्य, प्रदीप होडगर कांस्य, मल्हारराजे आढाव सुवर्ण व रौप्य, आदेश चव्हाण रौप्य व कांस्य, अविनाश गोल्हार कांस्य व रौप्य, स्वरूप कदम सुवर्ण व कांस्य, आदित्य पुजारी कांस्य व रौप्य, रुद्र अकोलकर कांस्य व सुवर्ण, ऋषिकेश खेडकर दोन सुवर्ण, आयान खान दोन कास्य, आरुष पाटोळे रौप्य व कांस्य, ईश्वर आघाव दोन कांस्य, प्रथमेश निरवान कांस्य व सुवर्ण, श्रवण डोंगरे कांस्य व रौप्य, वरद कोकरे कांस्य व सुवर्ण, प्रसाद निर्मल रौप्य व सुवर्ण, ओंकार नऱ्हे सुवर्ण व कांस्य, वेदांत जाधव सुवर्ण, रुद्रप्रताप मुळे रौप्य, पदकाची कमाई केली आहे व मुलींमध्ये. सना शेख सुवर्ण व कांस्य, जोया शेख कांस्य व सुवर्ण, श्रुती भैस दोन कांस्य, आदिती थोरात दोन रौप्य, आदिती आदमाने दोन कांस्य, स्वरांजली गाडेकर रौप्य व सुवर्ण, मेबल सदाफुले कांस्य व रौप्य, अभिरुची अनोळे दोन रौप्य, इरा साळुंके दोन रौप्य, सान्वी साळुंके सुवर्ण व कांस्य, प्रणिती इघे कांस्य व सुवर्ण, सांची शेणवी दोन कांस्य, हरिप्रिया भोरे सुवर्ण व कांस्य, आरोही आचारी रौप्य व कांस्य, वैष्णवी कुटे सुवर्ण व रौप्य, स्वरा कुरटे सुवर्ण व कांस्य, खुशी कुरटे दोन कांस्य, सृष्टी सावंतफुले दोन कांस्य, समृद्धी भोई दोन कांस्य, कुलसूम इराणी दोन कांस्य, मुस्कान शेख दोन कांस्य, संस्कृती सीनारे दोन कांस्य, आदिती होले दोन सुवर्ण, बोर्डे कृतिषा रौप्य, जिया पटेल सुवर्ण हे पदकाचे मानकरी ठरली आहे.



बारामती येथे झालेल्या महाराष्ट्र राज्य अजिंक्यपद कराटे स्पर्धेत अहिल्यानगर कराटे असोसिएशनचे खेळाडू प्रथम क्रमांकांच्या ट्रॉफीसह दिसत आहे.

या सर्व विजेत्या खेळाडूंचा सन्मान कराटे असोसिएशन ऑफ महाराष्ट्रचे अध्यक्ष युगेंद्र पवार, सचिव शिहान रवींद्र कराळे यांनी केला. या सर्व खेळाडूंना अहिल्यानगर कराटे असोसिएशनचे पदाधिकारी तथा प्रशिक्षक सेन्सेई बाबू सकट, सेन्सेई आदित्य क्षीरसागर, सेन्सेई सर्फराज सय्यद, सेन्सई सुरज गुंजाळ, सेन्सई साबील सय्यद, सहप्रशिक्षक आशिष केदारी, कुशल मेस्त्री, केतन जगताप, पायल पवार यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले आहे. तसेच सुवर्ण पदक विजेत्या खेळाडूंची दिल्ली येथे होणाऱ्या नॅशनल स्पर्धेसाठी अदिती होले, जिया पटेल, वेदांत जाधव व प्रसाद निर्मल या खेळाडूंची निवड झाली.

# नितीश कुमार व चंद्रबाबू नायडू हे केंद्रातील मोदी सरकार पाडणार


अखिल भारतीय काँग्रेस कमिटीच्या ओबीसी विभागाच्या मेळाव्यामध्ये बोलताना ओबीसी विभागाचे राष्ट्रीय अध्यक्ष कॅप्टन अजयसिंह यादव. यावेळी उपस्थित असलेले काँग्रेस ओबीसी विभागाचे प्रदेशाध्यक्ष भानुदास माळी, राष्ट्रीय समन्वयक मंगलताई भुजबळ आदींसह पदाधिकारी.

नगर – राजकारणात नितीश कुमार हे पलटूराम म्हणून ओळखले जातात व आता त्यांच्या जोडीला चंद्रबाबू नायडू यांच्या कुबड्या मोदी सरकारला आहेत. त्यामुळे येत्या एक–दोन वर्षात हे दोघेही मोदी सरकार पाडतील, असा दावा अखिल भारतीय काँग्रेस कमिटीच्या ओबीसी विभागाचे राष्ट्रीय अध्यक्ष कॅप्टन अजयसिंह यादव यांनी मंगळवारी घेण्यात आलेल्या पत्रकार परिषदेमध्ये केला. मोदी सरकार पडल्यावर इंडिया आघाडी सरकार स्थापन करू शकते. मात्र मोदी तसे होऊ न देता नव्याने निवडणुका देशावर लादतील, असा दावाही कॅप्टन यादव यांनी केला.

अखिल भारतीय काँग्रेस कमिटीच्या ओबीसी विभागाचा मेळावा पॅरेडाईज सभागृहात झाला. यावेळी काँग्रेस ओबीसी विभागाचे प्रदेशाध्यक्ष भानुदास माळी, राष्ट्रीय समन्वयक मंगलताई भुजबळ आदींसह पदाधिकारी उपस्थित होते.

केंद्रातील मोदी सरकार पाडण्याचे कोणतेही प्रयत्न इंडिया आघाडी करीत नाही. मात्र या सरकारच्या नितीशकुमार व चंद्रबाबू या दोन कुबड्याच हे सरकार पाडेल, असा दवा करून कॅप्टन यादव म्हणाले, यामुळेच केंद्राच्या यंदाच्या बजेटमध्ये निवडणुका होत असलेल्या महाराष्ट्र, झारखंड व हरियाणाला पैसे न देता केवळ नितीश कुमार व चंद्राबाबूला पैसे दिले आहेत. शिवाय मोदी स्वतःला देवता मानतात. अहंकार त्यांच्यात आहे, चारसो पार नारा संविधान बदलासाठीच दिला होता. त्यामुळे येत्या दोन वर्षात हे सरकार स्वतःच्याच वजनाने पडेल, असा दावाही यादव यांनी केला.

## सरकारने तो निर्णय घ्यावा

महाराष्ट्रमध्ये मराठा समाजाने ओबीसीमधून आरक्षण मागितले आहे. यावर स्पष्ट भाष्य करण्यास यादव यांनी नकार दिला. महाराष्ट्रातील सरकारने याबाबतचा निर्णय घ्यावा. प्रदेशाध्यक्ष नाना पटोले व ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी याबाबत मध्यम मार्ग काढण्याबाबत सुचवले आहे. त्यामुळे मुख्यमंत्र्यांनी आता याबाबत निर्णय घ्यावा, असे यादव यांनी स्पष्ट केले. मात्र, आरक्षण मर्यादा ५०% च्या पुढे देण्यासाठी जातीय जनगणना आवश्यक आहे, असे स्पष्ट करून यादव म्हणाले, जाती गणनाद्वारे प्रत्येकाची आर्थिक, सामाजिक व शैक्षणिक स्थिती समजेल. गरीब व श्रीमंत कोण हेही स्पष्ट होईल. त्यामुळे ज्याची जेवढी लोकसंख्या, तेवढे अधिकार त्यांना मिळतील. जाती गणना झाली नाही तर २०२६ मध्ये डीलिमिटेशन कसे करणार, असा सवाल करून ते म्हणाले, आम्ही सत्तेवर आल्यास जातनिहाय जनगणना करणार, मागास वर्गातील महिलांना आरक्षण देणार, पंचायत राज व्यवस्थेत आरक्षण देणार, क्रिमिलेयरची मर्यादा १२ लाख करणार, उच्च शिक्षणातही आरक्षण देणार, अशी ग्वाही त्यांनी दिली.

दरम्यान, ओबीसी विभागाने विधानसभेच्या २७ जागा प्रदेश काँग्रेसकडे मागितल्या आहेत व त्यात नगरची जागा महिला म्हणून मंगलताई भुजबळ यांना द्यावी असे पदाधिकाऱ्यांनी सुचवल्याचे प्रदेशाध्यक्ष भानुदास माळी यांनी यावेळी सांगितले. या पार्श्वभूमीवर राष्ट्रीय अध्यक्ष यादव यांनी, ज्या उमेदवाराचे प्रत्येक बुथवर किमान १० सदस्य असतील व बूथ स्तरावर संपर्क यंत्रणा आहे, अशांना पसंती दिली जाणार आहे. काँग्रेसचा निधी सिझ (जप्त) झाला असल्याने ज्या उमदवाराकडे निधी आहे त्यालाही पसंती असेल. यासंदर्भात निरीक्षक तिरूमला (केरळ) प्रत्येक मतदारसंघात दौरे करणार आहे, असे त्यांनी आवर्जून सांगून अहमदनगर शहरात मंगल भुजबळ यांना चांगले वातावरण असून त्यांच्यासाठी आम्ही वरिष्ठ लेवलवरून प्रयत्न करणार असल्याचे त्यांनी सांगितले.

## दोघांची तक्रार करणार

अखिल भारतीय काँग्रेस समितीच्या ओबीसी विभागाची नगरमध्ये बैठक असताना व राष्ट्रीय अध्यक्ष आले असताना काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष जयंत वाघ व शहर जिल्हाध्यक्ष किरण काळे हे या बैठकीकडे फिरकले नाही, याबाबत विचारले असता, यासंदर्भात ओबीसींचे प्रदेशाध्यक्ष भानुदास माळी, काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांच्याकडे तक्रार करतील, असे राष्ट्रीय अध्यक्ष यादव यांनी स्पष्ट केले. मात्र, जिल्हाध्यक्ष वाघ काही काळ बैठकीला आले होते व नंतर निघून गेले, असे ओबीसी राष्ट्रीय समन्वयक मंगल भुजबळ यांनी सांगितले.


उड्डाणपुलाच्या खाली रस्त्यावर साचलेला चिखल मनपाच्या अग्नीशामकदलातर्फे स्वच्छ करताना कर्मचारी.

# उड्डाणपुलाखाली रस्त्यावर साचलेला चिखल अग्निशामक विभागाच्या सहाय्याने स्वच्छ

### पावसाळ्यात दर आठवड्याला रस्ता स्वच्छ करण्यासाठी उपाय योजना करा : स्वप्निल शिंदे

नगर – नगर–पुणे महामार्गावरील चांदणी चौक ते मार्केट यार्ड चौकापर्यंत उड्डाणपुलाच्या खाली चिखल साचल्याने अनेक वाहने घसरत होती व छोटे–मोठे अपघात होत होते. ही बाब स्वप्निल शिंदे यांच्या निदर्शनास आली असता तात्काळ मनपाच्या अग्निशमन विभागाला संपर्क साधून पाण्याची गाडी बोलावून संपूर्ण रस्ता धुवून घेतला त्यावरती लाकडी भुसा टाकण्यात आला. हे चिखल पावसाळ्यात वाहनांनी व उड्डाणपुलाच्या खाली रस्त्याच्या दुभाजकांमध्ये झाडे लावण्यात आलेले आहे. त्या झाडांना पाणी टाकण्याच्या वेळेस संपूर्ण माती ही रस्त्यावर येते त्यामुळे त्या रस्त्यावर चिखल साचून वाहने घसरत असून पावसाळ्यात मनपाच्या वतीने आठवड्याला एकदा रस्ता धुवून घेण्यासाठी उपाययोजना करण्यात यावी, अशी मागणी देखील स्वप्निल शिंदे यांनी केली.

यावेळी स्वप्नील शिंदे, आकाश कोरे, अक्षय बर्गे, विशाल झेंडे, शुभम पारधे, बॉबी गायकवाड, विजय झेंडे, आकाश पोळ, आकाश सुयावंशी, अब्रार शेख, महेश घोडके, रोहन सगळगिले, कुमार नवगिरे, महेश उमाप आदीसह अग्निशमन विभागाचे कर्मचारी उपस्थित होते.

# स्वातंत्र्य दिनानिमित्त ७५० वृक्षारोपण उपक्रम



नगर – स्वातंत्र्य दिनानिमित्त इन्सानियत फाउंडेशन व माजी नगरसेवक शेख मुदस्सर अहमद इसहाक यांचावतीने मुकुंदनगर मध्ये ७५० वृक्षारोपणाचा उपक्रम राबवून बांधकाम कामगारांची नोंदणी मार्गदर्शन शिबिर आयोजित करण्यात आले आहे. या शिबिरामध्ये बांधकाम कामगार यांनी उपस्थित राहण्याचे आवाहन देखील करण्यात आले आहे.

स्वातंत्र्यदिनानिमित्त संपूर्ण मुकुंदनगर परिसरामध्ये ७५० हून जास्त वृक्षारोपण करण्यात येणार आहे व नागरिकांना मोफत वृक्ष वाटप करण्यात येणार असल्याचे शेख मुदस्सर व फाउंडेशनचे अध्यक्ष जमीर शेख यांनी सांगितले. नागरिकांनी या कार्यक्रमांमध्ये सहभाग नोंदवून वृक्षारोपण करावा असे आव्हान करण्यात आले आहे.

# अहमदनगर जिल्हा वाचनालय चित्रकला निबंध स्पर्धेस प्रतिसाद

### स्वातंत्र्यदिन चित्रकला स्पर्धेत पार्थ खेडकर, वृंदा घोडे तर निबंध स्पर्धेत स्वरा टाकसाले, मोनाली बोरुडे प्रथम


अहमदनगर जिल्हा वाचनालय आयोजित शालेय चित्रकला व निबंध स्पर्धेस प्रतिसाद मिळाला. (छाया – सुरेश मैड)

नगर – भारतीय स्वातंत्र्यदिनाचे औचित्य साधुन अहमदनगर जिल्हा वाचनालयाच्या वतीने आयोजित शालेय चित्रकला व निबंध स्पर्धेस प्रतिसाद मिळाला. या स्पर्धेत चित्रकला स्पर्धेला लहान गटात पार्थ खेडकर तर मोठ्या गटात वृंदा सचिन घोडे यांनी प्रथम तर निबंध स्पर्धेत पहिल्या गटात कु. स्वरा विजय टाकसाले तर खुल्या गटात सौ.मोनाली गणेश बोरुडे यांनी प्रथम क्रमांक पटकावला.

स्पर्धेचे पारितोषिक समारंभ अशोक निंबाळकर, अध्यक्ष प्रा. शिरिष मोडक, साहित्यिक व परिक्षक डॉ.चि.वि.जोशी, वृषाली पोंदे, प्रशांत शेकटकर यांच्या हस्ते झाला. यावेळी उपाध्यक्ष दिलीप पांढरे, संचालक किरण आगरवाल, खजिनदार तन्वीर खान, शिल्पा रसाळ, ग्रंथपाल अमोल इथापे, नितिन भारताल, पल्लवी कुक्कडवाल उपस्थित होते.

प्रास्तविकात प्रा.मोडक यांनी उगवत्या पिढीतील वाचन, लेखन, कला समृद्ध होण्यासाठी स्पर्धेचे आयोजन केले असल्याचे सांगितले.

प्रमुख पाहुणे अशोक निंबाळकर यांनी जिल्हा वाचनालय सातत्याने आदर्श समाजनिर्मितीमध्ये बहुमुल्य प्रयत्न करीत आहे. स्पर्धेतून मिळणारे प्रोत्साहन भविष्यातील आदर्श पिढी घडविण्यास प्रेरक असल्याचे सांगितले.

उपस्थितांचा सन्मान अध्यक्ष प्रा.मोडक व उपाध्यक्ष दिलिप पांढरे यांनी केला. सुत्रसंचालन शिल्पा रसाळ यांनी केले. स्पर्धेचा सविस्तर निकाल खालील प्रमाणे – निबंध स्पर्धा गट पहिला (शालेय) – प्रथम – स्वरा विजय टाकसाले, द्वितीय – समिक्षा जाधव, तृतीय – वेदिका सुरज जाधव. निबंध खुलागट – प्रथम – मोनाली गणेश बोरुडे, द्वितीय – स्नेहल कपिल शहा, तृतीय – समिक्षा कानिफनाथ आहेर.

चित्रकला स्पर्धा – गट पहिला – २ री ते ४ थी – प्रथम – खेडकर पार्थ, द्वितीय – रोकडे आराध्या, तृतीय– बिडकर इश्वरी. गट क्र. दुसरा – ५ वी ते ६ वी – प्रथम – घोडे वृंदा सचिन, द्वितीय – शहा तनिष्का, तृतीय – बोल्ली स्वरा रमेश.

# शिक्षणाचा पगडा असणारा विद्यार्थी कधीही चुकीच्या मार्गाला जात नाही

### आ. संग्राम जगताप यांचे प्रतिपादन; तारकपूर येथील सेंट मोनिका प्रॅक्टिसिंग स्कूल १५ ऑगस्टनिमित्त शालेय गणवेश, शूजचे वाटप


तारकपूर येथील सेंट मोनिका प्रॅक्टिसिंग स्कूलमध्ये १५ ऑगस्ट निमित्ताने शालेय गणवेश शूजच्या वाटप प्रसंगी आ. जगताप व विद्यार्थी. (छाया – लहू दळवी)

नगर – आजच्या विज्ञान तंत्रज्ञानाच्या युगामध्ये शिक्षणाला खूप महत्त्व प्राप्त झाले असून ते सर्वांना मिळणे गरजेचे आहे. सर्वसामान्य कुटुंबातील विद्यार्थी शिक्षणापासून खूप दूर असून त्याला मुख्य प्रवाहात आणण्यासाठी सामूहिक जबाबदारी आपली आहे. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सांगितले होते की शिक्षण हे वाघिणीचे दूध असून ते सर्वांना मिळाले पाहिजे. नामवंत शाळांमध्ये आता प्रवेश घेणे सुद्धा अवघड झाले आहे. यासाठी गोर–गरीब कुटुंबातील मुलांना शिक्षण देणाऱ्या मोठ्या संस्था असून त्यांना मदत करण व त्यांना पुढे घेऊन जाणे गरजेचे आहे. या संस्थांमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या सोयी सुविधा उपलब्ध करून दिल्यास चांगले विद्यार्थी घडले जातील. शिक्षणाचा पगडा असणारा विद्यार्थी हा कधीही चुकीच्या मार्गाला जात नाही. सरोजकुमार साळवे यांनी सकारात्मक दृष्टिकोनातून सामाजिक बांधिलकी जोपासत गरजूवंत विद्यार्थ्यांना शालेय साहित्य व शूज चे वाटप करून आपले कर्तव्य पार पाडले असल्याचे प्रतिपादन आ.संग्राम जगताप यांनी केले.

तारकपूर येथील सेंट मोनिका प्रॅक्टिसिंग स्कूल १५ ऑगस्ट निमित्त शालेय गणवेश, शूजचे वाटप आ.संग्राम जगताप यांच्या हस्ते झाले. यावेळी अशोक गायकवाड, निखिल वारे, बाळासाहेब पवार, जय भोसले, सरोजकुमार साळवे, प्राचार्य मनीषा पवार, भूपेंद्र परदेशी, रॉबिन साळवे, विनायक पंडित, पालक तोरणे, व्ही के पंडित,रेव्हरंड सतीश तोरणे,पिंटू माघाडे, सचिन जाधव, प्रशांत पगारे, किरण मते, अनिकेत साळवे, जयु काकडे,विद्यार्थी पालक शिक्षक उपस्थित होते.

अशोक गायकवाड म्हणाले की, गरजूवंत विद्यार्थ्यांसाठी संस्था चालवीत असताना खूप मोठी तफावत असून शिक्षकांना कसरत करावी लागते. एकीकडे गोरगरीब विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी तळमळ करावी लागते तर दुसरीकडे श्रीमंतांच्या मुलांना पंचतारांकित शिक्षण व्यवस्था उभी राहत आहे हे आपल्या देशाचे चित्र आहे यामध्ये देखील संस्था, शिक्षक, वृंद स्पर्धेच्या युगामध्ये विद्यार्थी घडवण्याचे काम करत आहे. ही बाब कौतुकास्पद आहे १५ ऑगस्ट निमित्त सरोजकुमार साळवे यांनी गरजूवंत विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप केले केले आहे. प्रास्ताविक ललिता दिवे तर सूत्रसंचालन प्रीती गाडेकर यांनी केले आभार प्रदर्शन सरोजकुमार साळवे यांनी मानले.



## टांगेगल्लीमधील अंतर्गत रस्त्यांच्या काँक्रिटीकरण कामाचा शुभारंभ

शहरातील प्रभाग क्रमांक १३ मधील टांगे गल्ली येथील अंतर्गत रस्ता काँक्रिटीकरणाचे काम माजी नगरसेवक पै. सुभाष लोंढे यांच्या प्रयत्नातून मार्गी लावण्यात आले. नुकतेच या रस्त्याच्या काँक्रिटीकरण कामाचा शुभारंभ पै. मनोज सुभाष लोंढे यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी सुरज शिंदे, शुभम दसरे, उमेश चेन्नूर, गणेश चेन्नूर, सुनील गायकवाड, अमोल बुरगुल, हिरालाल कोक्कुल, नेहल बिंगी, सार्थक दुर्गे, प्रमिला बिंगी, नरसुबाई चेन्नूर, सोनाली दुडगू, विजया दारकुंडे, राधाबाई गोने, सुनील हरबा आदी परिसरातील नागरिक.



मेहेर इंग्लिश स्कूलतर्फे नगर शहरातून शंभर फुटी तिरंगा ध्वज रॅलीत सहभागी झालेले विद्यार्थी. दुसऱ्या छायाचित्रात तिरंगा ध्वज रॅलीत सहभागी झालेले विद्यार्थी.

# विद्यार्थ्यांमध्ये देशभक्तीची भावना निर्माण व्हावी

### अजित बोरा यांचे प्रतिपादन; मेहेर इंग्लिश स्कूलतर्फे शहरातून शंभर फुटी तिरंगा रॅली, ५२५ विद्यार्थ्यांचा सहभाग

नगर – पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेनुसार हर घर तिरंगा हा उपक्रम हिंद सेवा मंडळाच्या शाळेमध्ये राबविण्यात आला. तिरंगा ध्वजाची रॅली दादा चौधरी विद्यालयातून नगर शहरातील प्रमुख मार्गावरून काढण्यात आली या रॅलीमध्ये उत्स्फूर्तपणे विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. विद्यार्थ्यांमध्ये देशभक्तीची भावना निर्माण व्हावी. असे प्रतिपादन हिंद सेवा मंडळाचे माजी कार्याध्यक्ष अजित बोरा यांनी केले आहे.

हिंद सेवा मंडळाच्या मेहेर इंग्लिश स्कूल व दादा चौधरी मराठी शाळे तर्फे शंभर फुटी तिरंगा ध्वजाची रॅली नगर शहरातून काढण्यात आली. तिरंगा ध्वजाची रॅली शहरातील प्रमुख मार्गावरून काढण्यात आली. या रॅलीत ५२५ विद्यार्थी सहभागी होते. दादा चौधरी विद्यालयातून, पटवर्धन चौक, लक्ष्मी कारंजा चौक, कोतवाली पोलीस स्टेशन, माणिक चौक, भिंगारवाला चौक, शहाजी राजे मार्ग चौक, तेलीखुंट चौक मार्गे नेता सुभाष चौक, चितळे रोड, येथून ही रॅलीचा समारोप मेहेर इंग्लिश स्कूल येथे करण्यात आला.

याप्रसंगी हिंद सेवा मंडळाचे माजी कार्याध्यक्ष अजित बोरा, मेहेर इंग्लिश स्कूल शाळेचे चेअरमन जगदीश झालानी, प्राचार्य प्रा.अनुरीता झगडे, मयूर बोचुघोळ, अजिंक्य गुरावे, सचिन पारखी, प्रशांत मुथा, सारिका सिदोरे, रितु सोनवणे, आशा घोरपडे, गीता वल्लाकट्टी, मोहिनी नराल, सत्यश्री चिलका, गायत्री भंडारे, अनिरुद्ध देशमुख, दिलीप परसपाटकी आदी उपस्थित होते.

जगदीश झालानी म्हणाले, तिरंगा ध्वजाच्या रॅलीत विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदविला. हर घर तिरंगा उपक्रम प्रत्येक घरोघरी राबविण्यात यावा यासाठी जनजागृती करण्यात आली आहे.

# क्रीडा शिक्षक महासंघाच्या जिल्हाध्यक्षपदी नंदकुमार शितोळे, सचिवपदी नितीन घोलप तर कार्याध्यक्षपदी अजित वडवकर

### महासंघाची जिल्हा कार्यकारिणी जाहीर



नगर – अहमदनगर जिल्हा शारीरिक शिक्षण व क्रीडा शिक्षक महासंघाची नुतन जिल्हा कार्यकारिणी जाहीर करण्यात आली. यामध्ये अध्यक्षपदी नंदकुमार शितोळे (श्रीगोंदा), सचिवपदी नितीन घोलप (राहुरी) व कार्याध्यक्षपदी अजित वडवकर (कर्जत) यांची एकमताने निवड करण्यात आली.

मागील पाच वर्षाच्या कालखंडात क्रीडा शिक्षक अधिवेशन, जिल्हा व राज्य पुरस्कार, शारीरिक शिक्षक संच मान्यता, ग्रेस गुण, पंच मार्गदर्शन शिबिरे व शिक्षकांच्या मदतीने पार पाडलेल्या विविध क्रीडा स्पर्धा यामुळे संघटनेचे काम राज्यभरात अग्रेसर राहिल्याची माहिती मावळते अध्यक्ष सुनिल गागरे यांनी दिली. तर संघटनेच्या स्थापनेपासून नगर जिल्ह्याने राज्य संघटनेच्या कार्यात सातत्याने पाठबळ दिल्याने शासनस्तरावर क्रीडा विषयक अनेक कामे मार्गी लागल्याचे प्रतिपादन मावळते सचिव शिरीष टेकाडे यांनी केले.

अहमदनगर जिल्हा क्रीडा महासंघाची सर्वसाधारण सभा कृषी विद्यापीठ राहुरी येथे झाली. यामध्ये अहमदनगर जिल्ह्यातील १४ तालुक्यामधील बहुसंख्य शिक्षक सहभागी झाले होते. क्रीडा शिक्षकांच्या ऑनलाइन कामातील अडचणी, अग्रीम रक्कम, खेळाडू अपघात विमा, ग्रामीण साठी असलेला १६ वर्षाचा शालेय वयोगट पुन्हा अमलात आणण्यासाठी प्रयत्न करणे, खेळाडूंचे ५ टक्के आरक्षण कायम करण्यासाठी प्रयत्न करणे, जिल्हा, राज्यस्तरावर उत्कृष्ट कार्य करणाऱ्या क्रीडा शिक्षकांचा पुरस्कार देवून सन्मान करणे, क्रीडा शिक्षक अधिवेशन आयोजित करणे, क्रीडा शिक्षक पद भरती, नवीन संचमान्यते नुसार क्रीडा शिक्षकांच्या भरतीसाठी शासनाकडे पाठपुरावा करणे, शारीरिक शिक्षणाचे तास शारीरिक शिक्षकांनाच मिळावे अशा विविध विषयावर विचार मंथन व सखोल चर्चा करण्यात आली. यावेळी क्रीडा महासंघाचे राज्याध्यक्ष राजेंद्र कोतकर यांनी सर्व शिक्षकांना भविष्यातील शारीरिक शिक्षकांची पदे आणि क्रीडा विषयक समस्यांवर सखोल मार्गदर्शन केले.

क्रीडा संघाचे माजी अध्यक्ष सुनील गागरे, माजी सचिव शिरीष टेकाडे, सोसायटीचे संचालक महेंद्र हिंगे, राज्य खजिनदार घनश्याम सानप व प्रशांत होन यांच्या निवड समितीने सर्वानुमते नवीन कार्यकारीणी जाहीर केली.

नवीन कार्यकारिणीचा सत्कार माध्यमिक शिक्षक संघाचे जिल्हाध्यक्ष आप्पासाहेब शिंदे, शिरीष टेकाडे, क्रीडा महासंघाचे राज्य अध्यक्ष राजेंद्र कोतकर, कोषाध्यक्ष घनःशाम सानप, महेंद्र हिंगे, प्राध्यापक व्याख्याते जितेंद्र मेटकर यांनी केला व नवीन पदाधिकाऱ्यांना भावी कार्यास शुभेच्छा दिल्या.

यावेळी भारत तांबे, दादा गदादे, बबन लांडगे, अजय शिरसाठ, प्रतिक दळे, प्रकाश मोढे, पुरब सुर्यवंशी, शंकर हळणार, कुंडलिक शिरोळे, विनायक गोरे आदी उपस्थित होते.

नवीन कार्यकारिणी पुढीलप्रमाणे:– अध्यक्ष– नंदकुमार शितोळे (श्रीगोंदा), सचिव– नितीन घोलप (राहुरी), कार्याध्यक्ष– अजित वडवकर (कर्जत), उपाध्यक्ष– बापूराव होळकर (पारनेर), राजेंद्र शिरसाठ (पाथर्डी), संजय कंगले (श्रीरामपूर), राघवेंद्र धनलगडे (जामखेड), कार्यालयीन सचिव– बाळासाहेब मुळे (नगर), सहसचिव– हनुमंत गिरी (राहता), पोपटराव काळे (शेवगाव), शिवप्रसाद घोडके (कोपरगाव), नारायण कडू (नेवासा), खजिनदार– ज्ञानेश्वर भोत (संगमनेर), प्रसिद्धी प्रमुख– संदीप घावटे (श्रीगोंदा), तर कार्यकारणी सदस्य– सुनिल मंडलिक, भारत शिंदे (अकोले), बापूराव गायकवाड (श्रीगोंदा ), धनंजय देवकर (कोपरगाव), दादासाहेब शिंगाडे (कर्जत), गंगाराम खोडदे (पारनेर), एकनाथ पालवे (पाथर्डी), पंकज जगताप (राहुरी), बबन सातकर (राहता), काकासाहेब चौधरी (श्रीरामपूर), दिलीप झोळेकर (अकोले).

# आनंदऋषीजी हॉस्पीटल हे सर्व स्तरातील रुग्णांकरीता एक वरदान

### उद्योजक अशोक चुडीवाल



आनंदऋषीजी हॉस्पिटलमध्ये किडनी आजार तपासणी व उपचार शिबीराचे दीपप्रज्वलनाने उद्घाटन करताना उद्योजक अशोक चुडीवाल व कुणाल बडजाते.

## किडनीचे आजार तपासणी व उपचार शिबिराला रूग्णांचा प्रतिसाद

नगर – आनंदऋषीजी हॉस्पिटल सातत्याने गरीब – गरजू रुग्णांकरीता मोफत आरोग्य तपासणी शिबीरे घेतात, त्यामुळे रुग्णांकरीता हे एक वरदान ठरत आहे. ही समाजाच्या दृष्टीने एक चांगली बाब आहे. समाजातील दु:ख निवारण्याचे काम जैन सोशल फेडरेशन हॉस्पिटलच्या माध्यमातून करीत आहे. या कार्याची व्याप्ती आणखी वाढून त्याचा जास्तीत जास्त गरजूंना लाभ व्हावा, यासाठी हॉस्पिटलने आता यापुढेही अशीच सेवा सुरु ठेवावी, असे प्रतिपादन उद्योजक अशोक चुडीवाल यांनी केले.

राष्ट्रसंत आचार्य श्री आनंदऋषीजी म.सा. यांच्या १२४ व्या जन्मदिनानिमित्त जैन सोशल फेडरेशनव्दारा संचलित श्री आनंदऋषीजी हॉस्पिटल ॲण्ड हार्ट सर्जरी सेंटरमध्ये किडनीचे आजार तपासणी व उपचार शिबाराचे उद्घाटन अशोक चुडीवाल व कुणाल बडजाते यांच्या हस्ते झाले. यावेळी महावीर बडजाते, सीएआयपी अजय मुथ्था, सुनिल मालू, सतिश लोढा, प्रकाश छल्लानी, माणकचंद कटारिया, सुभाष मुनोत, वसंत चोपडा, नेफ्रॉलॉजीस्ट डॉ. गोविंद कासट, डॉ. आशिष भंडारी आदी उपस्थित होते.

अशोक चुडीवाल म्हणाले की, कोरोना काळात रुग्णांना चांगली सेवा देऊन आनंदऋषीजी हॉस्पिटलने आदर्श काम केले. सामाजिक भान ठेवून आनंदऋषीजी हॉस्पिटल रुग्णांना सरकारी योजनांचा लाभ मिळवून देऊन त्यांचा आर्थिक भार हलका करत आहेत. सरकारी योजना प्रभावीपणे हॉस्पिटल राबवून रुग्णांना दिलासा देण्याचे काम करत असल्याचे सांगितले.

यावेळी कुणाल बडजाते म्हणाले की, रूग्णसेवा हा एक यज्ञ असून तो सातत्याने चालविणे अवघड काम आहे. हे अवघड शिवधनुष्य पेलण्याचे काम जैन सोशल फेडरेशनचे सर्व पदाधिकारी आनंदऋषीजी हॉस्पिटलच्या माध्यमातून सातत्याने करत आहे. ही गौरवास्पद बाब आहे. समाजातील प्रत्येक घटकाला योग्य ती सेवा दिली जात आहे. जे कार्य केले जाते पूर्ण श्रध्देने व निष्ठेने केले जात आहे. या कार्यात आम्हासही सहभागी करुन घेत असल्याने सुख–समाधान–शांती लाभत असल्याचे त्यांनी सांगितले.

डॉ. गोविंद कासट म्हणाले, आनंदऋषीजी हॉस्पिटलचे अद्ययावत मशीन असलेले डायलेसिस सेंटर आहे. अहमदनगर जिल्ह्यामध्ये एकमेव डायलेसिस सेंटर आहे की जिथे अद्ययावत पध्दतीने रूग्णांना सेवा दिली जाते. जैन सोशल फेडरेशनचा खूप मोठा आधारस्तंभ म्हणजे डायलेसिस सेंटर असून सेंटरमध्ये ३० डायलेसिस मशिन असून दरवर्षी २५ हजार डायलेसिस करण्यात येतात. आतापर्यत पाच लाखांपेक्षा जास्त डायलेसिस केले आहे. हेपिटाइटिस बी व सी च्या रुग्णांच्या डायलेसिसची स्वतंत्र व्यवस्था देणारे आनंदऋषीजी हॉस्पिटल हे एकमेव सेंटर आहे. तसेच फिशुला पंप, पर्मनंट कॅथेटर व रिनल अँजिओप्लास्टी ही सुविधा महात्मा फुले जन आरोग्य योजने अंतर्गत येथे पूर्णत मोफत दिली जाते. डायलेझर व प्रोसेसिंग नगर जिल्ह्यातील एकमेव युनिट आहे.

प्रास्ताविकात सीएआयपी अजय मुथ्था म्हणाले की, चुडीवाल, बडजाते परिवाराने हॉस्पिटलच्या सेवाकार्यास नेहमीच हातभार लावला आहे. आचार्यश्रींवरील श्रध्देतून अनेक दानशूर या मोठ्या कार्यात योगदान देतात. शिबीराच्या माध्यमातून तुमच्या शाबासकीमुळे एक प्रेरणा मिळते आणि नव्या उमेदीने शिबीरे घेण्यास मदत होते. हे सामाजिक कार्य अजून जोमाने करण्याचा मानस आहे. सामजिक बांधिलकीच्या माध्यमातून अत्याधुनिक मशिनरी व तज्ञ डॉक्टरांमार्फत कमी दरात रुग्णांना सेवा देण्याचा सातत्याने प्रयत्न हॉस्पिटलच्यावतीने सुरु असल्याचे सांगितले. अद्ययावत डायलेसिस विभाग रूग्णांसाठी वरदान ठरत आहे. या विभागासाठीही कायम अनेक दानशूरांनी सहकार्य केले आहे.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. आशिष भंडारी आभार प्रकाश छल्लानी यांनी मानले. या शिबीरात सुमारे ६५ रुग्णांची तपासणी करण्यात आली.



वर्ल्ड फुनाकोशी शोतोकान कराटे संस्थेच्या वतीने विविध बेल्ट परिक्षा घेण्यात त्यातील गुणवंत विद्यार्थी.

# मैदानी खेळांमुळे मुले जग पहायला, ओळखायला शिकतात

### मुख्य प्रशिक्षक हारुण शेख यांचे प्रतिपादन

नगर – मुलांना शालेय शिक्षण मिळालेच पाहिजे यात काही दुमत असायचे कारण नाही. बहुतांश वेळा आपण अभ्यासापुढे खेळाला महत्त्व देत नाही. खेळामधून मुले दुसऱ्याबरोबर कसे वागायचे, बोलायचे या गोष्टी शिकत असतात, हेच विसरून जातो. मुले जग पहायला, ओळखायला शिकतात आणि नव्या कल्पनांना जन्म देतात. खेळांमुळे मुलांचा शारीरिक विकास होतो. त्याशिवाय मैदानी खेळ खेळल्याने मुलांमध्ये सकारात्मक ऊर्जेचा विकास होतो, असे प्रतिपादन वर्ल्ड फुनाकोशी शोतोकान कराटे संस्थेचे मुख्यप्रशिक्षक हारुण शेख यांनी केले.

वर्ल्ड फुनाकोशी शोतोकान कराटे संस्थेच्या वतीने विविध बेल्ट परिक्षा घेण्यात त्यातील गुणवंत विद्यार्थी व समवेत वर्ल्ड फुनाकोशी शोतोकान कराटे संस्थेचे मुख्यप्रशिक्षक हारुण शेख, प्रशिक्षक रमजान शेख, इशान होशिंग, अशिष शिंदे, स्वराज नारायण, ऋषिकेश लालवाणी, पार्थ चतारे, ओमकार निमसे, बुऱ्हानुद्दीन हकीमजीवाला, सायली सुपेकर, दिपाली भालेराव, आदिती जाधव, महेक शेख, बिलाल शेख, तनवीर खान आदी उपस्थित होते.

विविध बेल्ट परिक्षेत यश मिळविणारे विद्यार्थी खालीलप्रमाणे – यलो बेल्ट – संस्कृती गोरे, आयुष कुटे, चेहेल ओस्तवाल, यशश्री चंगेडे, अक्षरा रासकर, अनन्या रासकर, वैष्णवी रासकर, दिवेष कांबळे, औरंज बेल्ट– शिवतेज वाघ, ओवी शिंदे, ग्रीन बेल्ट – ऱ्हिदय कांकरीया, स्पर्श कांकरीया, दीया गुगळे, उदय शिंदे, शौर्य चींता, अर्नव बोथरा, ब्लू बेल्ट – सिद्धांत राऊत, वंष काळे, आचल गुगळे, अनुष्का कोहक, संस्कृती राऊत, नैतीक कंठाली, पर्पल बेल्ट – तीरतेषा गुगळे, ब्राऊन बेल्ट – अष्कान शाह, ब्लॅक बेल्ट – मीहीर जोशी, श्रावणी काकडे, सेकंड डेन – आदित्य बोरा.

# डॉ. विठ्ठलराव विखे पाटील फाउंडेशनचे शास्त्र महाविद्यालयाचे सहायक प्राध्यापक गणेश बरकडे यांना पी.एचडी. पदवी प्रदान



नगर – डॉ. विठ्ठलराव विखे पाटील फाउंडेशन संचलित औषधनिर्माण शास्त्र महाविद्यालयातील सहाय्यक प्रा. गणेश बरकडे यांना सावित्रीबाई फुले विद्यापीठ पुणे यांनी नुकतीच पी. एचडी प्रदान केली. डॉ. बरकडे यांनी स्तनांचा कर्करोग व्यवस्थापन या विषयावर प्रबंध सादर केला होता. डॉ. बरकडे यांना डॉ. रमेश सावंत, उपप्राचार्य, डॉ. विठ्ठलराव विखे पाटील फाउंडेशन संचलित औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय अहमदनगर यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.

प्रा. बरकडे यांचे २३ लेख राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय नियतकालिकांचे प्रकाशित आहेत. त्यांच्या कर्करोगावरील संशोधनाला भारत सरकारकडून पेटंट प्रदान करण्यात आलेले आहे. त्याचबरोबर विविध राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय परिषदांमध्ये त्यांनी सहभाग नोंदविला आहे.

त्यांच्या या यशाबद्दल डॉ. विठ्ठलराव विखे पाटील फाउंडेशनचे विश्वस्त व चेअरमन राधाकृष्ण विखे पाटील, शालिनी विखे पाटील, संस्थेचे सीईओ डॉ. सुजय विखे पाटील, धनश्री विखे पाटील, सचिव डॉ. पांडुरंग गायकवाड, डॉ. अभिजीत दिवटे, प्राचार्य डॉ. प्रताप पवार, उपप्राचार्य व मार्गदर्शक डॉ. रमेश सावंत, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी आदींनी डॉ. बरकडे यांचे अभिनंदन केले.



भिंगार हायस्कूल येथे एनसीसी कॅडेटस् प्रथमवर्ष भरती प्रक्रियेत विद्यार्थ्यांच्या मुलाखती घेताना अधिकारी. दुसऱ्या छायाचित्रात लेखी परिक्षा देणारे विद्यार्थी.

# भिंगार हायस्कूल येथे एन.सी.सी. कॅडेट्स प्रथमवर्ष भरती उत्साहात

### ४६ जागांसाठी १०० पेक्षा जास्त विद्यार्थ्यांनी दिली चाचणी

नगर – अहमदनगर एज्युकेशन सोसायटीचे भिंगार हायस्कूल भिंगार येथे एन.सी.सी. युनिट प्रथम वर्षासाठी भरती प्रक्रिया काल उत्साहात झाली, ४६ कॅडेट्सच्या निवडीसाठी प्रक्रिया घेण्यात आली. ज्यामध्ये भिंगार हायस्कूल मधील इयत्ता आठवीच्या विद्यार्थ्यांनी उत्साहाने सहभाग घेतला. विशेषत: विद्यार्थिनींनी भरतीमध्ये विशेष रस दाखवला. सुमारे १०० पेक्षा जास्त विद्यार्थ्यांनी उत्साहाने मैदानात शारीरिक चाचणी दिली यासह लेखी परीक्षा सोबत विद्यार्थ्यांच्या मुलाखती घेण्यात आल्या. त्यामध्ये एन.सी.सी. मध्ये सामील होण्याबद्दल अतिशय मनोरंजक कल्पना व्यक्त केल्या गेल्या. विद्यार्थ्यांचा उत्साह पाहून सुभेदार बाबासाहेब कचरे आणि हवालदार नरेंद्र सिंग यांनीही आपले अनुभव सांगितले.एन.सी.सी चे महत्व तसेच जीवनात एकता आणि शिस्त अंगीकारण्याचा सल्ला दिला.

१०० पेक्षा जास्त उमेदवारांपैकी ४६ विद्यार्थ्यांची निवड परीक्षेत मिळालेल्या गुणांच्या आधारे, गुणवत्तेच्या आधारे केली जाईल, असे १७ महाराष्ट्र बटालियनचे कमांडिंग कर्नल चेतन गुरुबक्ष यांनी सांगितले. एन.सी.सी. कॅडेटसाठी ॲडम ऑफिसर ले. कर्नल रणदीप सिंग, एस.एम. लोकेंद्र सिंग, सुभेदार बाबासाहेब कचरे व इतर अधिकाऱ्यांचे सहकार्य लाभले. या भरती प्रक्रियेसाठी विद्यालयाचे प्राचार्य कासार सर व पर्यवेक्षिका सौ. गायकवाड यांचे विशेष मार्गदर्शन लाभले.

# पेमराज सारडा कनिष्ठ महाविद्यालयीन विद्यार्थ्यांकडून परंपरेनुसार यंदा देखील सैनिकांसाठी राखी उपक्रम

### धागा राखीचा... धागा शौर्याचा... मध्ये आर्मी हवालदार ज्ञानदेव भांड यांची उपस्थिती



पेमराज सारडा कनिष्ठ महाविद्यालयीन परंपरेनुसार यंदादेखील सैनिकांसाठी राखी उपक्रम घेण्यात आला.

नगर – उत्पादन आणि उत्पन्न या दोन्ही घटकांना कृतिशील उपक्रमांद्वारे अध्यापन करणाऱ्या पेमराज सारडा कनिष्ठ महाविद्यालयात, अकरावीच्या विद्यार्थिनींनी अतिशय सुरेख अशा राख्या तयार करून त्या राख्यांचे स्टॉल लावले होते. विशेष बाब म्हणजे शहरातील इतर राखी स्टॉल पेक्षा अत्यंत अल्प दरात सारडाच्या विद्यार्थिनींनी कलात्मक राख्या तयार करून त्या कमी दरात विकण्याचे, संवाद कौशल्य कृति युक्त सहजतेने संपादन केले.

पेमराज सारडा कनिष्ठ महाविद्यालयीन परंपरेनुसार यंदा देखील सैनिकांसाठी राखी उपक्रम घेण्यात आला. विद्यार्थ्यांना शाबासकीची थाप देण्याकरिता ज्ञानदेव भांड, आर्मी गांधीनगर रँक हवालदार (मराठा लाईट इन्फंट्री) हे उपस्थित होते.

या प्रसंगी बोलताना श्री.भांड म्हणाले की, सैनिकांच्या मनगटावर राखीतून आपली माया व्यक्त करणे हे अनोखे दृश्य आज पाहावयास मिळाले. शिवाय बाजारात नेमके कोणते ज्ञान–व्यवहार कौशल्य संपादन केले तर व्यवसाय करता येईल याचे जे प्रशिक्षण सारडा मध्ये मिळते ते कुठेही पाहाण्यात आले नाही.

पेमराज सारडा कनिष्ठ महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना सुरुवातीला फक्त राखी मेकिंग स्पर्धा घेण्यात येणार आहे, हे सांगण्यात आले. उद्दिष्य हे होते की कला शाखेच्या विद्यार्थिनींनी राख्या कराव्यात आणि वाणिज्य शाखेच्या विद्यार्थिनींनी त्याचे रुपया मध्ये रुपांतर करावे तथापि लर्निंग मेकिंग स्पर्धेत अर्निंग शिकण्याची वास्तव ओढ मुलींमध्ये दिसून आली. जवळपास साडेचारशे राख्यांचे स्टॉल उभारण्यात आले होते.

याप्रसंगी बोलताना उपप्राचार्य डॉ. मंगल भोसले यांनी सर्व विद्यार्थिनींना मार्केटिंग स्किल आले पाहिजे सांगितले व सर्व विद्यार्थिनीचे भरभरून कौतुक केले.

एकीकडे सैनिकांसाठी पाठविण्यात येणार असलेल्या बॉक्स मध्ये राख्या आणि संदेश तर दुसरीकडे राख्या घेण्यासाठी सर्व विद्यार्थी, प्राध्यापक हजर राहिले त्यामुळे या प्रसंगाला उत्सवाचे स्वरूप लाभले.यावेळी प्राचार्य डॉ. माहेश्वरी गावित यांनी विद्यार्थिनींना मार्गदर्शन केले व आगामी काळात सारडा कॉलेज हे कृतिशील अध्यापनात सर्व श्रेष्ठ ठरेल हा आनंद व्यक्त केला. हिंद सेवा मंडळाच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी या उपक्रमाचे कौतुक केले.

राखी मेकिंग स्पर्धेसाठी परीक्षक म्हणून प्रा. अविनाश झरेकर, प्रा. अतुल कुलकर्णी यांनी काम पाहिले. प्रा.मंगेश भुते, प्रा.अभिजित जोशी, प्रा.श्रीकांत तुपे, प्रा.श्रेयस रामदासी यांनी या विद्यार्थ्यांना व्यावसायिक कौशल्याचे धडे दिले. कार्यक्रमाची संपूर्ण धुरा प्रा.माणिक रासने, प्रा.राधिका ऋषी, प्रा.गीता देशमुख, प्रा.अर्चना कुलकर्णी यांनी सांभाळली.



रुपीबाई मो. बोरा, न्यू इंग्लिश स्कूल माध्य व उच्च माध्य. विद्यालयात कॅन्सर जनजागृती 'कार्यक्रम झाला. याप्रसंगी डॉ. जुनागडे तेजश्री, प्राचार्य अजयकुमार बारगळ, कॅन्सर सेंटरचे प्रदिप काकडे, सौ. दिपाली पाटोळे आदि.

# रुपीबाई मोतीलालजी बोरा विद्यालयात कॅन्सर जनजागृती कार्यक्रम

नगर – रुपीबाई मो. बोरा, न्यू इंग्लिश स्कूल माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात कॅन्सर जनजागृती 'कार्यक्रम झाला. स्वामी विवेकानंद विद्या प्रतिष्ठान संचलित आरंभ पॅलिएटिव्ह, कॅन्सर केअर सेंटर तज्ञ मार्गदर्शकच्या मार्फत झाला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाचे प्राचार्य अजयकुमार बारगळ होते. कार्यक्रमाचे प्रमुख वक्ता आरंभचे डॉ. जुनागडे तेजश्री या कॅन्सर तज्ञ म्हणुन होत्या. आपल्या भाषणातून त्यांनी विद्यार्थ्यांना कॅन्सर विषयी माहिती दिली. प्राथमिकस्तरात कॅन्सरचे योग्य निदान झाले तर तो पूर्णपणे आटोक्यात येऊ शकतो, तसेच आपल्या 'आरंभ' या कॅन्सर जनजागृती सेंटर तर्फे विविध पुरविल्या जाणाऱ्या सुविधा, अगदी शेवटच्या टप्प्यातील कॅन्सर योद्धयांसाठी त्यांच्या घरी जाऊन उपचार शक्य होत नाही अशांना त्यांचा वेदनारहित आनंदी उपचार निशुल्क करण्यात येतो. आरंभ कॅन्सर सेंटर विषयी अधिक माहिती कॅन्सर सेंटरचे प्रदिप काकडे यांनी विद्यार्थ्यांना दिली. तसेच संबंधित सेंटरच्या जनजागृती अधिकारी सौ. दिपाली पाटोळे या देखील उपस्थित होत्या.

सूत्रसंचालन विद्यालयाच्या अध्यापिका सौ. जयश्री टोकशिया यांनी तर आभार सौ. निलम मुळे यांनी मानले. या कार्यक्रमासाठी विद्यालयाच्या उपप्राचार्या सौ.आरण्ये वंदना आणि पर्यवेक्षक वाबळे बाळासाहेब यांचे मार्गदर्शन लाभले.

अहमदनगर एज्युकेशन सोसायटीच्या प्रमुख कार्यवाह श्रीमती छायाताई फिरोदिया, नियामक मंडळाचे अध्यक्ष अशोक मुथा, सहकार्यवाह गौरव फिरोदिया, स्कूल कमिटीचे चेअरमन गौरव मिरिकर, सल्लागार भूषण भंडारी यांनी कॅन्सर जनजागृती कार्यक्रम राबविल्याबद्दल शाळेचे कौतुक केले.

# 'माझा तिरंगा मोहिमे'चे गिनीज बुकसाठी नामांकन

### डॉ. अमोल बागुल वितरित करणार ५५५५ भारतीय तिरंगा ध्वज



नगर – सांस्कृतिक मंत्रालय, भारत सरकार यांच्या वतीने समस्त देशभरामध्ये भारताच्या ७८ व्या स्वातंत्र्य दिनाच्या निमित्ताने ९ ते १५ ऑगस्ट २०२४ पर्यंत हर घर तिरंगा मोहीम राबविण्यात येत आहे. हे औचित्य साधून येथील उपक्रमशील शिक्षक डॉ.अमोल बागुल अल्प कालावधीमध्ये 'माझा तिरंगा' मोहिमेअंतर्गत सुमारे ५५५५ भारतीय तिरंगा ध्वज वितरित करणार असून यासाठी गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डसह अन्य जागतिक विश्वविक्रमांसाठी नामांकन प्राप्त झाले आहे.

सांस्कृतिक मंत्रालय, भारत सरकार यांच्याकडून बागुल यांना भारतीय ध्वज तसेच हर घर तिरंगा मोहिमेचे प्रमाणपत्र प्राप्त झाले आहे. पर्यावरणपूरक कागदी भारतीय ध्वज वितरित होणार असून विद्यार्थी, शिक्षक तसेच पालकांना या मोहिमेत सहभागी होण्याचे आवाहन करण्यात येत आहे. ज्यांना माझा तिरंगा ध्वज हवा असेल त्यांनी ९५९५५४५५५५ या क्रमांकावर संपर्क साधावा.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहमदनगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

# आय.एम.एस.सी.डी.आर.येथे ग्रंथपाल दिन उत्साहात साजरा



ग्रंथपाल दिन हा दरवर्षी भारतातील ग्रंथालय विज्ञानाचे जनक पद्मश्री डॉ. एस.आर. रंगनाथन यांच्या जयंतीदिनी साजरा केला जातो. १८९२ मध्ये शियाली, मद्रास येथे जन्मलेल्या डॉ. रंगनाथन यांनी त्यांच्या ग्रंथालय विज्ञानाच्या पाच नियमांद्वारे ग्रंथालय व्यवस्थापन आणि वाचक–केंद्रित सेवेत क्रांती घडवून आणली. कॉलन वर्गीकरण आणि वर्गीकृत कॅटलॉग कोड यांसारख्या त्यांच्या योगदानाचा जगभरात मोठा प्रभाव पडला आहे. ग्रंथालय विज्ञानातील त्यांच्या अमूल्य योगदानासाठी भारत सरकारने १९५७ मध्ये त्यांना पद्मश्री पुरस्काराने सन्मानित केले. डॉ. एस.आर. रंगनाथन यांनी ग्रंथालय विज्ञान तत्त्वांप्रती केलेल्या समर्पणाने आधुनिक ग्रंथालयांचा पाया घातला.

आय.एम.एस. लर्निंग रिसोर्स सेंटर, शिक्षणाला प्रोत्साहन देण्यात आणि शैक्षणिक समुदायाला समर्थन देण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावते. माहिती व तंत्रज्ञानाच्या साधनांचा वापर करून, हे कार्य अधिक प्रभावी होते. केवळ पुस्तके आयोजित करण्याच्या पलीकडे, ग्रंथालयांनी त्यांच्या सेवांची गुणवत्ता, कार्यक्षमता आणि एकूणच वाचकांचे समाधान सुधारले आहे. हे उद्दीष्ट डोळ्यासमोर ठेवून, आय.एम.एस. ग्रंथालय सतत नवीन सेवा सुरू ठेवत आहे. तसेच दैनंदिन कार्ये व्यवस्थापित करणे आणि वाचकांचा वेळ योग्यप्रकारे वापरला जात असल्याचे सुनिश्चित करणे, ज्याप्रमाणे ग्रंथालय विज्ञानाच्या चौथ्या नियमाने मार्गदर्शन केले आहे. ग्रंथालयाला सलग दुसऱ्या सायकलमध्ये पुन्हा एकदा अंतर्गत–बाह्य ग्रंथालय ऑडिटमध्ये अ ग्रेड प्राप्त झाला आहे. हे ऑडिट २०२०–२१ मध्ये आणि अलीकडेच २०२३–२४ साठी करण्यात आले आहे.

ग्रंथपाल दिन / लायब्ररीयन डे सेलिब्रेशन इव्हेंट म्हणजे विद्यार्थी, प्राध्यापक आणि कर्मचारी सदस्यांशी संवाद साधण्याची संधी आहे. यासारखे उपक्रम अर्थपूर्ण सहयोगी प्रयत्नांना आणि नाविन्यपूर्ण कल्पनांची देवाणघेवाण करण्यासाठी तयार करतो. हा कार्यक्रम आय.एम.एस. कुटुंबाचा अविभाज्य भाग आहे. आय.एम.एस. लायब्ररीमध्ये त्यांच्या योगदानाला आदरांजली वाहिली. परम श्रद्धेने डॉ. एस.आर. रंगनाथन यांच्या फोटोला संचालक डॉ. एम. बी. मेहता यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आला. ग्रंथालयातील कर्मचारी सिराज मुलानी या दिवशीचे महत्त्व, ग्रंथालयाचे योगदान आणि त्याच्या सर्वसमावेशक संसाधने व आधुनिक पायाभूत सुविधा, तसेच प्रशासन, सेवा, पायाभूत सुविधा, आणि संशोधन योगदानाच्या आधारे शैक्षणिक उत्कृष्टतेला चालना देणाऱ्या ग्रंथालयाचे महत्त्व या विषयावर भाषण दिले.

याप्रसंगी डॉ.विक्रम बार्नबस, विभागप्रमुख डॉ. यू. एच. नगरकर, डॉ. प्रोनोती तेलोरे, सौ. शरयू कुलकर्णी, नरेंद्र कदम, ग्रंथपाल डॉ. स्वाती बार्नबस, प्रशासकीय कर्मचारी, ग्रंथालय कर्मचारी जितीन आढाव, कु.कृष्णकुमारी थोरे, राजेश कांबळे, सौ. रजिया शेख इत्यादी उपस्थित होते. या कार्यक्रमात भारतातील ग्रंथालय विज्ञानाचे जनक डॉ. एस.आर. रंगनाथन यांच्या अग्रेसर प्रयत्नांना केवळ आदरांजलीच वाहिली नाही, तर ग्रंथालये घडवण्यात महत्त्वाची भूमिका अधोरेखित करण्याचा उद्देश होता.

**– डॉ. एम. बी. मेहता**
संचालक, आय.एम.एस., अहमदनगर

